नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

डिसेंबर १९६०

★

युगवाणी

य. देशपांडे

या अंकातील लेखक व क[illegible]

सौ. वि. देशपांडे
पु. य. देशपांडे
पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर
प्रा. श्री. गो. काशीकर
प्रा. राम शेवाळकर
जयंत देवधर
विनायक खवले
कृष्णा चौधरी
अनिल दहिवाडकर
बासूत चौधरी
आत्माराम भोय[illegible]

मूल्य ५० नये पैसे

संपाद[illegible]

अनुक्रमणिका

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयाकरिता मान्य झालेले)

युगवाणी

डिसेंबर १९६०

संपादक-मंडळ
संपादक पु. य. देशपांडे
सदस्य प्र. वा. ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

★ ★ ★

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

वर्ष १५] [अंक ८

कला जीवन : समीक्षा संस्कृति

डिसेंबर १९६०

सिद्धप्रज्ञ आणि शैली

सिद्धप्रज्ञ माणसाचे विचार व्यक्त करण्याची म्हणून स्वतंत्र अशी शैली नसते. शैली, तंत्र, रस, विभाव, अनुभाव इत्यादि, सूर्यकिरणात जसे सातहि रंग असतात, तसेच यांच्या विचारातच हे सर्व प्रकार असतात. म्हणूनच शैलीचे अनुकरण होत नसते. अनुकरण जिचे होऊ शकते ती शैली नव्हे. म्हणूनच सत्पुरुष किंवा सिद्धप्रज्ञ यांचे विचार हीच त्यांची शैली आणि हेच त्यांचे तंत्र !

विचार हे फूल आणि तंत्र हा सुगंध ; तो मुळातच अभिजात असला तरच बाहेर दरवळेल. कागदी फुलात असा सुगंध अभिजात कसा असणार ? कृत्रिम सुगंध निर्माण केलाच तर तो क्षणजीवीच असणार !

—श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती महाराज
(टेंबे स्वामी)— चरित्र आणि कार्य
लेखक : पं. श्रीपादशास्त्री किंजवडेकर,
प्रसाद दीपावली अंक, ऑक्टोबर १९६०

धर्मभावनेची नष्ट झालेली बाजू

लेखकः– प्रो. पॉल टिलिच, हार्वर्ड युनिव्हर्सिटी

आपल्या पाश्चात्य सुधारणेकडे सहज दृष्टिक्षेप करणाऱ्याऱ्याहि हे चटकन् ध्यानात येईल की, आजच्या मानवाच्या धर्मभावनेत एक फार मोठी उणीव उत्पन्न झाली आहे. अमेरिकेतील जीवनाकडे पाहणाऱ्याच्या तर ही उणीव अधिक चटकन् ध्यानात येईल. वस्तुतः आज जिकडे तिकडे पाहिले तर धार्मिक चळवळींना नव्याने बहर आल्यासारखा दिसत आहे. किंवा अधिक काटेकोरपणे बोलायचे तर धार्मिक गोष्टींविषयी कुतूहल निर्माण झालेले दिसून येत आहे, असे म्हणणे योग्य होईल. या नव्या कुतूहलाची साक्ष चर्चच्या वाढत्या सभासदसंख्येत दिसून येईल. त्याचप्रमाणे नवनव्या धर्मपंथांच्या उदयात व प्रसारातहि ती दिसून येईल. विद्यालयांच्या परिसरात आणि विश्वविद्यालयातील धार्मिक शिक्षण–विभागांच्या वाढीतहि त्याला हेच दिसेल. पण धर्मभावनेबद्दलचे वाढते कुतूहल सर्वात जास्त ठळकपणे कोठे आढळून येत असेल, तर ते विली ग्रॅहॅम व नॉर्मन व्हिन्सेंट पील या धर्मोपदेशकांच्या प्रचंड लोकप्रियतेत आढळून येईल. दर रविवारी चर्चमध्ये किंवा बाहेरच्या धार्मिक सभांतून या दोन धर्मोपदेशकांच्या प्रवचनांना जी विलक्षण लोकप्रियता मिळत आहे, जी वाढती गर्दी लोटत आहे, ती लोकांमधील धार्मिक भावना वाढीला लागत आहे, असेच नाही का दर्शवीत? या प्रत्यक्ष वस्तुस्थितीबद्दल दुमत होणे शक्य नाही. पण या वाढत्या धार्मिक कुतूहलाचा अर्थ काय लावावयाचा हा मुख्य प्रश्न आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य मनुष्याची जी मनःस्थिति आहे, तिचेच आविष्कार या वरील घटनात आढळून येतात, हे उलगडून दाखविण्याचा माझा हेतु आहे. पण मला एवढेच दाखवून थांबावयाचे नाही. कारण सध्याच्या काळातील मानवाच्या या मनोवस्थेवरून, सर्वकाळातील व पृथ्वीवरील सर्व ठिकाणच्या मानवाच्या मनोवस्थेचे एक महत्वाचे दर्शन घडते, अशी माझी श्रद्धा आहे.

सपाटपणा व सखोलपणा

सध्याच्या काळातील मनुष्य व समाज यांच्यातील परस्पर संबंधांचे नाना प्रकारचे पृथक्करणात्मक सिद्धान्त आज मांडले गेलेले आहेत. आजच्या परिस्थितीतील अनेक महत्वाच्या घटकांवर त्यामुळे बराच प्रकाश पडतो हे खरे आहे. पण

आजच्या परिस्थितीचे अचूक निदान करणे व त्यावर उपाय सुचवणे फारसे कुणाला साधले नाही असे मला वाटते. असे निदान करणे व उपाय सुचवणे हे सोपे काम नाही हे मी जाणून आहे. आणि तरीहि या दिशेने मी प्रयत्न करून पाहणार आहे. असे करताना मी जे विधान करणार आहे ते प्रथमदर्शनी बुचकळयात पाडणारे आहे असे वाटेल. मला असे वाटते की, पाश्चात्य मनुष्याच्या सध्याच्या मनोवस्थे-मधील प्रमुख गोष्ट कोणती असेल तर त्याच्या जीवनाची एक बाजूच, एक परिमाण dimension नष्ट झाले आहे, ही होय. प्रत्येक घन वस्तूला लांबी, रुंदी व उंची किंवा खोली अशी तीन परिमाणे असतात. आजच्या पाश्चात्य मनुष्याच्या जीवनातील हे '**खोलीचे परिमाण**' नष्ट झाले आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. मनुष्याच्या आध्यात्मिक जीवनाला जे परिमाण असते त्यालाच 'सखोलतेचे परिमाण' असे म्हणता येते. तेच आता नष्ट झाले आहे.

या शब्दप्रयोगाचा अर्थ काय आहे? याचा सरळ अर्थ असा आहे की, पुढील प्रश्नांना काय उत्तरे द्यावी हे आजच्या माणसाला समजेनासे झाले आहे. जीवनाला काय अर्थ आहे? आपण कोठून आलो व कोठे जाणार? जन्ममृत्यूच्या या अल्प अवकाशात आपण काय केले पाहिजे, काय बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे? मनुष्याच्या जीवनातील 'सखोलतेचे परिमाण' नष्ट झाले की, अशा प्रश्नांची उत्तरे काय द्यावी हे त्याला कळत नाही; फार काय पण असे प्रश्न मनुष्य स्वतःला विचारीतसुद्धा नाही. सध्याच्या काळातील माणसाचीही अशीच अवस्था झाली आहे. पूर्वीच्या पिढयातील माणसे ज्याप्रमाणे वरील प्रकारचे प्रश्न स्वतःला अगदी गंभीरपणे व आर्ततेने करीत असत, त्याप्रमाणे स्वतःला असे प्रश्न विचारण्याचे धैर्य आजच्या माणसात उरले नाही. आणि या प्रश्नांची उत्तरे समजा कोणी दिली, तर ती ग्रहण करण्याचेहि धैर्य त्याच्यात राहिले नाही.

धर्माची खरी व्याख्या

या 'खोलीच्या परिमाणा'ला मनुष्याच्या स्वभावांतील 'धार्मिक परिमाण' किंवा 'धार्मिक बाजू' असे संबोधणे अधिक योग्य होईल असे मला वाटते. आपल्या जीवनाला काय अर्थ आहे, हे उत्कटतेने व आर्ततेने स्वतःला विचारणे व या प्रश्नाची जी उत्तरे मिळतील ती दु:खकारक असली, तरी ती स्वीकारण्यास तयार असणे– याचेच नाव माणसाला धार्मिक भावना असणे हा आहे, असे मी मानतो. धार्मिक भावनेची अशी व्याख्या केल्यास हा सार्वत्रिक मानवी धर्म साकारू शकतो. मात्र धर्माची प्रचलित जी व्याख्या आहे, तिच्यापेक्षा ही व्याख्या फारच वेगळी ठरते. या व्याख्येप्रमाणे, एका किंवा अनेक ईश्वरांवर श्रद्धा आणि या दैवतांशी स्वतःचा संबंध जोडण्यासाठी करावी लागणारी कर्मे आणि प्रस्थापित केल्या जाणाऱ्या संस्था, अशी धर्माची व्याख्या होणार नाही. एवढे खरे की,

आजवर जे वेगवेगळे धर्म पृथ्वीच्या पाठीवर उदयास आले, त्या धर्मांची व्याख्या मात्र वरीलप्रमाणे मान्य झालेली अशी व्याख्या आहे. परंतु मर्यादित अर्थाने ज्याला धर्म म्हणून म्हणतात, त्याच्यापेक्षा खऱ्या मूलभूत धर्माचे अंतःस्वरूप अधिक विशाल व व्यापक असते. स्वतःच्या जीवनाबद्दलचे व एकंदर जीवनाबद्दलचे गूढ समजावून घ्यावे असे उत्कटतेने वाटत राहणे, म्हणजेच या व्यापक अर्थाने धार्मिक बनणे होय, अशी माझी श्रद्धा आहे.

या व्यापक अर्थाने जे धार्मिक असतात, त्यांना असे वाटते की, मर्यादित अर्थाने जे धर्म प्रचलित आहेत, त्यांच्यापासून आपण फार दूरदूर आहोत. जीवनाच्या अर्थाचे गूढ शोधण्यामागे या प्रकारचे जे लोक लागतात, ते प्रचलित असणाऱ्या धर्मापासून दूर राहतात. कारण असे हे जीवनाचे गूढ समजून घेण्याची तळमळ या प्रचलित धर्मात नसते, असे त्यांना वाटते. ही तळमळ प्रस्थापित धर्मामध्ये योग्य रीतीने व्यक्त झालेली नसते, असे त्यांना वाटते. असे हे लोक खऱ्या अर्थाने धार्मिक वृत्तीचे असतात. पण ते कोणताहि धर्म मानीत नाहीत. असा हा अनुभव येत असल्यामुळेच जीवनार्थाच्या 'सखोलतेची बाजू' ज्यात आविष्कृत झाली आहे असा विशाल व व्यापक धर्म आणि विशिष्ट प्रकारच्या प्रतीकात व संस्थात आविष्कृत झालेले वेगवेगळे प्रचलित धर्मपंथ, यांच्यात फरक करणे आवश्यक ठरते. ही भूमिका व हा भेद लक्षात ठेवून आपण जर सद्यःपरिस्थितीतील धार्मिक परिस्थितीचे विश्लेषण करू लागलो, तर धर्माची व्यापक अर्थाचीच व्याख्या आपणास प्रमाण मानली पाहिजे हे दिसून येईल. कोणत्याहि विशिष्ट धर्माची व्याख्या आपण ध्यानात घेता उपयोगी नाही. या व्यापक धर्माच्या दृष्टिकोणातून आपण सद्यःस्थितीतील मानवाच्या मनोवस्थेकडे पाहू लागलो, तर आपणास काय आढळेल ?

जीवनार्थाविषयीच्या अमर्याद तळमळीने जीवन व्यापले जाणे, अशी जर आपण धर्माची व्याख्या केली, तर आपल्याला हे दिसून येईल की, आजच्या मनुष्याच्या जीवनातून ही अमर्याद तळमळ नष्ट झाली आहे. त्याचबरोबर आपणास हेहि दिसेल की, आज धार्मिक चळवळींना जो बहर आलेला दिसत आहे, तो वास्तविक काही तरी हरवलेले, नष्ट झालेले परत मिळविण्यासाठी होणारा व्यर्थ प्रयत्न आहे.

याचे कारण काय ?

जीवनाचे 'सखोलतेचे परिमाण' कसे नाहीसे झाले ? प्रत्येक महत्वाच्या घटनेमागे ज्याप्रमाणे अनेक कारणे असतात, त्याचप्रमाणे या नाशाच्या मागेहि अनेक कारणे आहेत. परंतु धार्मिक व्यासपीठावरून याच्या मुळाशी असणारे जे एक कारण म्हणून सांगण्यात येते, ते मात्र याचे कारण मुळीच नाही. आधुनिक

अनुक्रमणिका

मनुष्यात बोकाळलेली सार्वत्रिक अश्रद्धा हे याचे कारण धर्मोपदेशकांकडून सांगण्यात येते; परंतु आजवरच्या कोणत्याहि काळातील माणसापेक्षा आधुनिक मनुष्य हा अधिक अश्रद्ध किंवा अधिक सश्रद्ध आहे असे मला वाटत नाही. आधुनिक माणसातील ही 'सखोलतेची बाजू' नाहीशी होण्याचे कारण माझ्या दृष्टीने असे आहे: विज्ञानामुळे व तंत्रज्ञानामुळे आज मानवाने निसर्गावर आपला विलक्षण प्रभाव पाडलेला आहे, निसर्गाला जिंकले आहे. निसर्गावर व बाह्य जगावर अधिकाधिक तावा मिळविण्याचा हा काळ आहे. अशा या आधुनिक काळात माणसाचा जगाशी जो संबंध आहे व स्वतःशी जो संबंध आहे, त्यात विलक्षण बदल घडून आल्यामुळेच, मानवी जीवनातील ही सखोलतेची बाजू नाहीशी झाली आहे, असा माझा विश्वास आहे. मानवी जीवनातील सखोलतेची जागा आज लांबी रुंदीने व्यापली आहे. ज्या यंत्रयुगीन समाजात आपण राहत आहोत, त्या समाजाच्या मागील शक्ति या लांबीरुंदीच्या दिशेने विस्तारणाऱ्या आहेत, खोलीच्या दिशेने नाही. लौकिक भाषेत हेच व्यक्त करायचे झाल्यास, 'अधिकाधिक चांगले,' 'अधिकाधिक मोठे' व 'संख्येने अधिकाधिक' या शब्दांच्या द्वारा आधुनिक मनुष्याची अपेक्षा व प्रगतीची दिशा व्यक्त केली जाते. अर्थात् या अपेक्षांच्या मागे मनुष्याच्या ज्या भावना आहेत, त्यांना कमी लेखण्याचा माझा मुळीच हेतु नाही. या जगाचे आपणास अधिकाधिक ज्ञान होत आहे व या जगामध्ये आपणास सुखकर व सोइस्कर असे अधिकाधिक अमर्याद फरक आपण घडवून आणीत आहोत, हा आजच्या माणसाचा अभिमान अगदी रास्त आहे. विज्ञानाच्या द्वारा सर्व दिशांना अप्रतिहतपणे माणसाच्या ज्ञानाचा विस्तार होत चालला आहे, यांत शंकाच नाही.

दिक्–भ्रमणाची आकांक्षा

लांबी रुंदीच्या दिशेने अमर्यादपणे पुढे पुढेच जात राहण्याच्या या मानवी आकांक्षेचे एक प्रतीक म्हणणेच पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेपलीकडील अवकाशात जाण्याचा मानवाचा प्रयत्न होय. या बाबतीत एक गमतीची गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. गुरुत्वाकर्षण–कक्षेपलीकडील अवकाशाला आजकाल दिक् (space) म्हणतात आणि त्या अवकाशातील भ्रमणालाच '–space travel–' असे नाव देतात. पण वस्तुतः सगळेच प्रवास– या पृथ्वीवरचे व आकाशांतील– म्हणजे दिक्भ्रमण नाही का? एवढे मात्र खरे की, गुरुत्वाकर्षण-कक्षे-पलीकडील वैश्विक अवकाशात प्रक्षेपकास्त्रांचा प्रवास सुरू झाल्यापासून आपण प्रथम आपल्याला खऱ्या दिक्चा (space) शोध लागला, असे आजच्या माणसाला वाटू लागले आहे. पण या वैश्विक अवकाशात विमानांनी प्रवेश केल्यापासून मानवी जीवनातील खोलीची बाजू कमी होऊन, लांबी रुंदीच्या बाजूंनीच अधिक विस्तार होऊ लागला आहे.

लांबीरुंदीच्या सपाट पृष्ठभागाच्याच दिशेने मनुष्य जो सारखा पुढेपुढे जात आहे, तो कशासाठी, काय मिळविण्यासाठी जात आहे, असा प्रश्न आपण विचारला, तर त्याचे उत्तर देणे कठिण होईल. एकदा असे वाटते की, सतत पुढेपुढे जात राहण्याच्या, अफाट, अमर्याद दिशांनी विस्तारत राहण्याच्या उन्मादातच आजच्या माणसाला समाधान लाभत असावे. पण हे उत्तर अपुरे होईल. कारण काळामध्ये व दिक्‌मध्ये मनुष्य जसजसा अधिकाधिक पुढेपुढे जात राहतो, तसतसा तो आक्रमिलेल्या किंवा व्यापलेल्या काळामध्ये व दिशेमध्ये फरक घडवून आणीत असतो. दिक्कालात घडविलेल्या या फरकांमुळे खुद्द मनुष्याच्याहि जीवनात बदल होत राहतो. प्रगतीच्या या मार्गात जे जे माणसाला आढळते, त्या सर्वांचे तो साधन बनवतो. आणि या प्रक्रियेमध्ये अखेर तो स्वतःच एक साधन बनून जातो; पण मनुष्य कशाचे साधन बनतो, असा प्रश्न जर विचारला, तर त्या प्रश्नाचे उत्तर मात्र सापडत नाही.

रोजच्या जीवनातील उदाहरणे

आजच्या मनुष्याची जी अवस्था सध्या झाली आहे, तिची उदाहरणे शोधण्यास आपणाला आपल्या दैनंदिन व्यवहारापलीकडे जाण्याचीहि गरज नाही. आपल्या नित्य जीवनात ऑफिसमध्ये किंवा घरामध्ये, मोटारीत किंवा विमानात, सभात किंवा संमेलनात, मासिके वाचताना किंवा टेलिव्हिजन पाहताना, वृत्तपत्रांतील जाहिराती वाचताना किंवा रेडिओ ऐकताना आपण जो वेळ घालवतो, त्यात आपल्या जीवनातील खोलीच्या बाजूला कुठेच स्थान नाही, असे आपणास आढळून येते. आपल्या या धावपळीच्या जीवनातील प्रत्येक क्षण भरलेला आहे. आपल्याला काहीतरी सारखे अव्याहतपणे करायचे असते, ऐकायचे असते, बोलायचे असते किंवा निदान योजायचे तरी असते. पण जीवनातील सखोलतेचा अनुभव घेण्यासाठी मनुष्याला क्षणभर थांबून, सारे काही बंद करून स्वतःच्या जीवनाचा विचार करणे किंवा त्याचा शोध घेणे अवश्य असते. पुढच्या क्षणाला काय करायचे आहे, हा विचार जर माणसाने सोडून दिला तरच त्या शांत क्षणांचा अर्थ त्याला समजू शकेल आणि आपल्या जीवनाचा खरोखर काय अर्थ आहे हे गंभीरपणे तो स्वतःला विचारू लागेल. दिसायला केवढ्याहि महत्वाच्या, मोलाच्या व आकर्षक गोष्टी असल्या, तरी वस्तुतः त्या क्षुल्लक व तात्पुरत्या स्वरूपाच्या आहेत हे जाणून त्यांच्याबद्दलची चिंता व धडपड जोवर माणूस बंद करीत नाही, तोवर जीवनाच्या ज्या अर्थाची व स्वरूपाची चिंता करायला हवी, ती चिंता समोर उभीच राहू शकत नाही. आजच्या या गडबडीच्या, धडपडीच्या व अखंड धावपळीच्या आधुनिक जीवनात सखोलतेची बाजू जी नाहीशी झाली आहे, तिचे मूळ कारण हे असे आहे. या सखोलतेच्या बाजूचा ऱ्हास म्हणजेच खऱ्या व सर्वव्यापी अर्थाने धर्मभावनेचा ऱ्हास होय.

अनुक्रमणिका

धार्मिक प्रतीकांचा नाश

एकदा मानवी जीवनातील या सखोलतेच्या बाजूचा ऱ्हास झाला की साहजिकच त्या बाजूची अभिव्यक्ति ज्याज्या प्रतीकांच्या रूपाने मानवी जीवनात झाली होती, ती ती प्रतीकेहि नाश पावणारच. या ठिकाणी मला पाश्चात्य जगातील जे दोन इतिहास कालातील धर्म– ज्यू धर्म व ख्रिश्चन धर्म– आहेत तेच अभिप्रेत आहेत. या दोन धर्मांतील प्रतीकांचा जो नाश झाला, त्याचे मूळ कारण आधुनिक विज्ञानाने त्यांच्यावर चढविलेला हल्ला हे नसून, त्या प्रतीकांच्या खऱ्या अर्थाचा विसर पडून त्याबद्दल निर्माण झालेला अपसमज हे होय. धार्मिक प्रतीकांच्या खऱ्या अर्थाबद्दल असे अपसमज रूढ झाले, म्हणूनच आधुनिक विज्ञानाला त्यांच्यावर हल्ला चढविता आला. या हल्ल्याला सबळ कारणहि होते. पाश्चात्य जगाला धर्महीन बनविण्यात कुणी पहिले पाऊल उचलले असेल, तर ते या धर्मांनीच, त्यांच्या धर्मोपदेशकांनीच. धर्माच्या प्रतीकांचा प्रतीकात्मक अर्थ न लावता त्या खऱ्याखुऱ्या घटना किंवा गोष्टी आहेत असे जेव्हा धर्मप्रमुख सांगू लागले, तेव्हाच ते विज्ञानाशी चाललेली लढाई हरले. जीवनाच्या सखोलतेच्या बाजूची किंवा खऱ्याखुऱ्या धर्मभावतेची अभिव्यक्ति करणारी जी सामर्थ्यशाली प्रतीके धर्मांत होती, त्यांचा धर्मोपदेशकांकडूनच सपाट पृष्ठभागावरच्या सर्वसामान्य व्यावहारिक घटनांप्रमाणे अर्थ लावण्यात येऊ लागला. सखोलतेच्या परिमाणातून उचलून आणलेली सामर्थ्यशाली प्रतीके सपाट पृष्ठभागावर आणून टाकताच ती अर्थशून्य व निष्प्रभ बनून जातात. आणि मग पदार्थविज्ञान, जीवशास्त्र, आणि इतिहास या शास्त्रांना त्यांच्यावर हल्ला चढविणे सुलभ होऊन बसते.

दैवी अधिष्ठानावर आधारलेल्या विश्वनिर्माणाच्या प्रतीकाचे जेव्हा जुन्या काळात घडलेल्या घटनात रूपांतर केले जाते, तेव्हा त्या घटनांना शास्त्रीय दृष्ट्या ऐतिहासिक आधार सापडत नाही. आणि आधुनिक विज्ञानाने प्रस्थापिलेल्या नियमांशी विसंगत असे कितीतरी घटक त्या विश्वनिर्मितीच्या गोष्टीत आढळून येतात. मानवाची स्वर्गच्युति, हे जे ख्रिश्चन धर्मातील एक प्रतीक आहे, त्याचा खरा अर्थ मानवाची त्याच्या खऱ्या जीवनापासून ताटातूट, होणे हा आहे. परंतु जेव्हा या प्रतीकाचे रूपांतर सपाट पृष्ठभागाच्या दिशेने किंवा व्यावहारिक पातळीवर केले जाते, तेव्हा ती एका मानवी जोडप्याची कहाणी बनते. सध्या जेथे इराक हा देश आहे, तेथे अनेक हजार वर्षांपूर्वी वसति करणाऱ्या एका मानवी जोडप्याची ती कथा होते. या रूपांतर–प्रक्रियेत मानवी जीवनातील एका गहन मनोविश्लेषणात्मक अवस्थेचे रूपांतर एका असंभाव्य मानवी कथेत होते. मानवाचा उद्धारकर्ता म्हणून येशू ख्रिस्ताचे जे प्रतीक आहे, ते मानवी जीवनात येणाऱ्या संजीवनसामर्थ्याचेच वस्तुतः प्रतीक आहे. पण पृष्ठभागाच्या दिशेने व्यावहारिक

पातळीवर त्याला खाली उतरविले की, स्वर्गातून पृथ्वीवर येणाऱ्या व परत स्वर्गात जाणाऱ्या एका दैवी मानवाची ती कथा बनते. या स्वरूपात ती आधुनिक विज्ञानवाद्यांना अर्थशून्य वाटावी, हे अगदी साहजिक आहे.

अर्थशून्य वाद

'मानवी जीवनाचा गूढार्थ शोधण्याच्या आर्ततेचे पर्यवसान' या अर्थाने ईश्वराच्या कल्पनेकडे न पाहता, सपाट पृष्ठभागावर त्या कल्पनेला जर उतरवून आणले, तर ईश्वर इतर व्यक्तींसारखीच पण सामर्थ्यशाली अशी व्यक्ति बनते. आणि मग तिच्या अस्तित्वाबद्दल व सामर्थ्याच्या इतर पुराव्याबद्दल विज्ञान साहजिकच शंका उपस्थित करते. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलचा जो वाद सनातन कालापासून चालत आला आहे, तो मानवी जीवनातील सखोलतेचे परिमाण नाश पावल्याचाच दर्शक आहे. या वादातील दोन्हीहि बाजू अयथार्थ आहेत, कारण हा वाद मुळातच अर्थशून्य आहे, आणि सखोलतेचे परिमाण नष्ट झाल्यामुळेच तो चाललेला आहे.

वर दर्शविलेल्या दिशेने जाऊन माणसाने एकदा सखोलतेचे परिमाण ऱ्हास पावू दिले की, आणि त्याबरोबरच त्या परिमाणाची प्रतीकेहि नाश पावू दिली, की, तो सपाट पृष्ठभागावर येऊन उतरतो, व त्याचाच एक भाग बनून जातो. त्याचा 'स्व' नष्ट होऊन जातो व तो इतर वस्तूंमधील एक 'वस्तु' बनतो. मानव-नियंत्रित वस्तूंच्या उत्पादनांतील व वितरणातील तो केवळ एक घटक बनून जातो. आधुनिक मानवाची आजच्या यंत्रप्रधान युगातील ही अवस्था सर्वांच्या परिचयाची झाली आहे, आजच्या समाजव्यवस्थेत प्रत्येकावर किती व कसे नियंत्रण ठेवले जात आहे, याची आपल्याला कल्पना येऊन चुकली आहे. मग आपल्यापैकी कुणी त्यातले नियंत्रण करणारे का असेनात. उदाहरणे द्यावयाची झाली तर ज्या टोळीत किंवा कंपूत वाठाळू वयाची मुले असतात, त्या टोळीच्या किंवा कंपूच्या विचारांचा किंवा भावनांचा या वाठाळू मुलांवर होणारा परिणाम, मोठमोठ्या संस्थांचा त्यांच्यात काम करणाऱ्यांवर पडणारा प्रभाव, आजच्या वाहतुकीच्या विविध व जलद साधनांमुळे व चहूकडे डोळयांना भिडणाऱ्या नाना प्रकारच्या जाहिरांतीमुळे माणसाचे मन कसे विशिष्ट दिशेने नकळतपणे घडविले जात आहे, याची आकर्षक वर्णने, इ. अनेक पुस्तकांतून व लेखांतून केलेली आपण वाचलेली आहेत.

जड यांत्रिकता व मनुष्यत्व

सर्व दिशांनी होणाऱ्या या बहुरंगी माऱ्यामुळे मनुष्य अगतिकपणेच भोवतालच्या वस्तूंपैकी एक वस्तु बनून जातो. आसपासच्या विविध शक्तींनी व भल्याबुऱ्या संस्कारानी चालविलेले एक यंत्रच तो बनून जातो. स्वेच्छेने, स्वतंत्रपणे

व जबाबदारीने निर्णय घेणारा त्याच्यामधील 'स्व' हा बिचारा कुठल्याकुठेच गुदमरून जातो. नानाप्रकारच्या उपयुक्त वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी माणसाने जे प्रचंड संघटना-यंत्र उत्पन्न केले आहे, ते यंत्र माणसाचीहि एक वस्तु बनवून टाकते आणि ते संघटना-यंत्रच त्याच्या सर्व हालचाली मर्यादित करून टाकते.

पण अशा यांत्रिक अवस्थेप्रत मनुष्य अगतिकपणे येऊन पोचला असला, तरी त्याच्यातील मनुष्यत्व नाहीसे होत नाही. या परिस्थितीविरुद्ध त्याचा सतत धैर्याने झगडा चालू असतो. तो मनाला प्रश्न विचारतो, 'हे सारे मी कशासाठी करीत आहे ?' आणि त्याला काही या प्रश्नाचे उत्तर गवसत नाही. आपल्या जीवनात उत्पन्न झालेली पोकळी त्याला सतत जाणवते. ती भरून काढण्यासाठी तो सतत पुढेपुढे जात राहतो, वेगवेगळ्या हेतूंसाठी, साध्यांसाठी अधिकाधिक, नवनवी साधने उत्पन्न करण्याची तो खटपट करतो. पण अखेर या साध्यांचे साधनांतच रूपांतर होते, आणि आता या साधनांचे साध्य कोणते हे त्याला समजेनासे होते. आपल्याला काय झाले आहे, आपले काय बिघडले आहे, हे त्याला नीट कळत नाही. पण जीवनात अर्थ राहिला नाही, आपल्या जीवनातील सखोलतेचे परिमाण नाहीसे झाले आहे, एवढे मात्र त्याला जाणवते.

या जाणिवेतूनच जीवनाच्या व विश्वाच्या अर्थाचे धार्मिक प्रश्न त्याच्या मनात उत्पन्न होऊ लागतात. या प्रश्नांना कधी धार्मिक उत्तरे मिळतात किंवा मिळणारी उत्तरे असमाधानकारक म्हणून कधी टाकली जातात. धर्माविषयीची आधुनिक माणसाची वृत्ति समजावून घेण्यासाठी आपणास प्रथम एक गोष्ट केली पाहिजे. पाश्चात्य जगातील आधुनिक मानवाची आपल्या अवस्थेची जाणीव जेथे जेथे तीव्रपणे व्यक्त होते, ती ती स्थळे आपण लक्षात घेतली पाहिजेत. ही स्थळे म्हणजे मोठमोठ्या कलाकृति, साहित्यकृति आणि काही प्रमाणात आजचे तत्वज्ञान, ही होत. या तिन्ही क्षेत्रात ज्या ज्या कृति आधुनिक काळात निर्माण झाल्या आहेत, त्यांच्या विषयांतून व त्यांच्या अभिव्यक्तीच्या पद्धतींतूनहि जीवनाचा अर्थ शोधण्याची आर्त व उत्कट धडपड दिसून येते. ज्या मानवी जीवनातील सखोलतेचे परिमाण नष्ट झाले आहे, त्या मानवी जीवनाचा अर्थ शोधण्याची ही धडपड आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. या साऱ्या कृति संकुचित अर्थाने धार्मिक आहेत असे मुळीच म्हणता येणार नाही. पण त्यांच्यातून मूलभूत व खऱ्या धार्मिक प्रश्नाबद्दलची जी तळमळ व्यक्त झालेली दिसते व ज्या सखोलतेने तो प्रश्न विचारलेला असतो, तितकी तळमळ व तितकी सखोलता तथाकथित धार्मिक गोष्टीतूनहि व्यक्त झालेली दिसत नाही.

कलात्मक प्रेरणा व धर्मभावना

जेव्हा एखादा कादंबरीकार आपल्या कादंबरीत पुढील प्रकारची जीवनचित्रे

रेखाटतो: जेथे गेल्याने आपल्या जीवनाचा प्रश्न सुटेल असे एखाद्या माणसाला वाटते, तेथे जाण्याचा त्या माणसाचा अखंड प्रयत्न विफल झालेला दाखविला जातो; किंवा एखाद्या पापाच्या जाणिवेने एखाद्या माणसाचे सारे जीवन काळवंडले आहे व अखेर त्या पापाच्या जाणिवेने सतत घेरल्यामुळे तो माणूस कोलमडून पडतो, असे दाखविलेले असते; किंवा एखाद्या विचाऱ्याला स्वत:ची अशी इच्छा असतच नाही व जो दैवाच्या फेऱ्यात अगतिकपणे मृत्यूकडे ढकलला जातो, असे रेखाटलेले असते. किंवा भोवतालच्या साऱ्याच गोष्टींबद्दल आत्यंतिक उवग व तिरस्कार एखाद्या माणसाच्या जीवनात भरून राहिला आहे, असे वर्णिले जाते;– तेव्हा या साऱ्या रेखाटनामागे जीवनाचा अर्थ काय, हा मूलभूत धार्मिक प्रश्न विचारण्याचाच कादंबरीकाराचा हेतु असतो.

कवि देखील आपल्या अशा कृतींतून हाच प्रश्न विचारीत असतो. आपल्या मनाच्या अज्ञात भागांचे आसुरी दर्शन घडवून त्याबद्दल वाटणारे आकर्षण व भीति, या दोहोंचे जेव्हा कवि चित्रण करतो; किंवा आपल्या मानसिक विश्वातील वाळवंटांचे व रिकाम्या, अर्थशून्य भागांचे जेव्हा कवि वर्णन करतो; किंवा जीवनाच्या पृष्ठभागाखाली दडलेल्या शारीरिक व नैतिक घाणीचे जेव्हा तो दर्शन घडवितो; किंवा आपल्या जीवनात अखंड घर करून राहणाऱ्या चिंतेला व्यक्तता देण्यासाठी जेव्हा तो जीविताच्या क्षणभंगुरतेची गीते गातो,– तेव्हा तो हाच मूलभूत धार्मिक प्रश्न विचारीत असतो.

नाटककारहि आपल्या नाटकातून हाच प्रश्न विचारीत राहतो. एखाद्या विडंबनात्मक प्रतीकाच्या द्वारा जेव्हा तो जीवनातील आभासाचे दर्शन घडवतो; किंवा एखाद्याने आयुष्यभर केलेल्या एखाद्या कृतिमधील व्यर्थता जाणवून जेव्हा त्याचा आत्मनाश घडून आलेला दाखविलेला असतो; किंवा माणसामाणसामध्ये सुप्तपणे वसत असणारा द्वेष व पाप यांची माणसावर केवढी जबरदस्त पकड असते ही गोष्ट व्यक्त करू लागतो; किंवा मानवी जीवनातील भग्न झालेल्या आशांचे व मानवी जीवनाच्या त्यामुळे होणाऱ्या ऱ्हासाचे दर्शन घडवतो, तेव्हा तोहि नेमका हाच धार्मिक प्रश्न विचारीत असतो.

चित्रकारहि हाच प्रश्न विचारतो. जेव्हा दृष्टीला दिसणाऱ्या पृष्ठभागाचे तुकडे तुकडे करून ते पुन्हा अशा तऱ्हेने तो जुळवतो की, त्यातून निर्माण झालेल्या कलाकृतीचे जगातील कोणत्याच परिचित वस्तूशी साम्य नसते, पण ज्या चित्रातून आतली चिंता मात्र व्यक्त होते आणि कठोर वस्तुस्थितीशी झगडण्याची आपली असमर्थताहि व्यक्त होते; अशा चित्रांच्या द्वारा चित्रकार हाच प्रश्न विचारीत असतो.

वस्तुशिल्पकारहि हाच प्रश्न विचारतो. कार्यालयांच्या किंवा देवळांच्या इमारती बांधताना आजचा शिल्पकार साधी सरळ रचना करतो; पूर्वीच्या शिल्पातील नक्षी व कलाकुसर यांचा तो बुद्धिपुरस्पर त्याग करतो. कारण आजच्या जीवनाचे ते प्रतीक होऊ शकत नाही. पूर्वीच्या शिल्पात दिसणारे नक्षी काम, कोरीव काम व सौंदर्याचे आविष्कार मुद्दाम बाजूला सारून, तो केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनेच निर्माण केलेल्या वास्तूंमधील शिल्पदारिद्र्य पत्करतो. असे करण्यात मूलभूत प्रश्नाचे आपण उत्तर देत आहोत, असे तो मुळीच समजत नाही. पण त्याचे उत्तर प्रामाणिक असते एवढे मात्र त्याला माहीत असते.

आजचे तत्वज्ञान

आजचे तत्वज्ञान याच सुप्त धार्मिक प्रवृत्तीला व्यक्तता देते. आजचे तत्वज्ञान दोन विचारप्रणालींमध्ये विभागले गेले आहे. एक पृथक्करणवादी (analytical) विचारसरणी आहे. आजच्या आधुनिक विज्ञानसंशोधनामागे जे विशिष्ट तर्कशास्त्र व जी विशिष्ट भाषेची रूपे आहेत, त्यांचे पृथक्करण ही विचारसरणी करते. आधुनिक चित्रकार ज्याप्रमाणे वस्तूंचे जे नैसर्गिक आकार आहेत, त्यांचे तुकडे करून त्यातून घन, पृष्ठभाग व रेषा यांची नवी निर्मिति करतात, किंवा ज्याप्रमाणे वास्तुशिल्पकार आपल्या वास्तूमध्ये दिसून येणारा 'हाडांचा सापळा' तसाच उघडा राहू देतात व त्याला नक्षीने नटविण्याचा प्रयत्नहि करीत नाहीत, त्याचप्रमाणे हे पृथक्करणवादीहि करतात. स्वतःवर अशा तऱ्हेचे बंधन घालून घेतल्यामुळे या तत्वज्ञानाच्या आविष्कारात संन्याशाचे दारिद्र्य आणि गंभीरता ही दिसून येतात. या तत्वज्ञानाच्या आविष्करणपद्धतीमध्ये धर्माचा काही संबंध दिसत नसला, तरी ज्ञानी माणसाच्या विचारात जो विनय दिसून येतो, तो यात असल्यामुळे हे तत्वज्ञान खऱ्या अर्थाने धार्मिकच आहे.

या तत्वज्ञान्यांपेक्षा अगदी वेगळ्या प्रकारचे जे अस्तित्ववादी (एक्झिस्टेन्शिएलिस्ट) तत्वज्ञानी आहेत, ते मात्र मानवी जीवनातील नाना समस्यांबद्दल स्पष्ट ऊहापोह करतात. लेखक, कवि, कलावंत, चित्रकार किंवा शिल्पकार जे जे आपल्या विशिष्ट माध्यमांतून व्यक्त करीत आहेत, ते ते अस्तित्ववादी हे बुद्धिगम्य व तर्काधिष्ठित अशा कल्पनांच्या द्वारा व्यक्त करतात. आजच्या परिस्थितीत व आजच्या काळात मानवाला जी विलक्षण चिंता व भीति वाटते, पापाच्या ज्या शंकांमुळे मनुष्य व्यग्र होतो, जीवनाची जी अर्थशून्यता त्याला जाणवते, त्या सर्वांना अस्तित्ववादी आपल्या तत्वज्ञानातून अभिव्यक्ति देतात. सतराव्या शतकातील पास्कल या तत्वज्ञापासून तो हायडेगर व आजचा सार्त्र या सर्व अस्तित्ववाद्यांनी मानवी प्रतिष्ठा व मानवी दैन्य, यांच्यामधील भयानक अंतर

उत्कटतेने नजरेस आणून दिले आहे. हे करण्याच्या क्रियेमधून त्यांनी मूलभूत धार्मिक प्रश्न समोर मांडला आहे. यापैकी काहींनी त्या प्रश्नाचें उत्तर देण्याचाहि प्रयत्न केला आहे. पण हे उत्तर जुन्या परंपरांना व विचारांना धरून आहे, त्यामुळे ते आजच्या आपल्या सर्वस्वी भिन्न काळातील प्रश्नाचें उत्तर होणे कसे शक्य आहे ?

प्रश्न व उत्तरे

अशा स्वरूपाची उत्तरे देण्यामुळे ते प्रश्न तर सुटतच नाहीत, उलट ज्या मानसिक अवस्थेमधून ते प्रश्न उत्पन्न झाले असतात, ती मानसिक अवस्था अधिक दृढ करण्याचेच तेवढे कार्य या उत्तरामुळे घडून येते. आज ज्या धार्मिक चळवळींचें तथाकथित उत्थान झालेले दिसून येते, त्या चळवळींचे प्रमुख प्रतिनिधि जे ख्रिश्चन धर्मोपदेशक विली ग्रॅहॅम व नॉर्मन व्हिन्सेंट पील, त्यांनाच उद्देशून मी हे लिहिले आहे. विली ग्रॅहॅम हा आधुनिक मानवापुढे उभ्या राहिलेल्या धार्मिक समस्येसंबंधी जी उत्तरे देतो, त्याविषयी असे म्हणता येईल की, त्याचा व्यक्तिगत प्रामाणिकपणा व श्रद्धा ही जरी निर्विवाद असली, तरी त्याच्या प्रचाराच्या ज्या पद्धति आहेत व दैवी घटनांबद्दल त्याची जी प्राथमिक स्वरूपाची श्रद्धा व आग्रह आहे, त्यामुळे आजच्या मानवाच्या प्रश्नांना समर्पक व समाधानकारक उत्तर त्याच्याकडून मिळणे अशक्य आहे. मूलभूत प्रश्नांच्या मानाने त्याचे उत्तरांचे सामर्थ्य फारच तोटके पडते. तो गंभीरपणे जरी प्रश्नाकडे पाहत असला, तरी आजच्या मूलभूत धार्मिक प्रश्नाचा मात्र तो गंभीरपणे विचार करीत आहे असे वाटत नाही.

नॉर्मन पीलचा लोकांवर प्रभाव अशा स्वरूपाचा आहे की, त्यामुळे ज्या मानसिक अवस्थेतून मानवाला बाहेर काढावयास पाहिजे, ती अवस्था दृढच होत जाते. आपल्या प्रभावाने तो अनेकांच्या मानसिक व्याधि बऱ्या करतो खऱ्या. पण या बऱ्या झालेल्या लोकांना पुन्हा त्याच स्पर्धामय, यांत्रिक जीवनात ढकलून देण्यासाठीच, त्यांना तो बरे करतो, असे म्हणणे प्राप्त आहे. ज्या समाजातून सखोलतेचे परिमाण नष्ट झाले आहेत, त्याच समाजात पुन्हा मिसळून जाण्यासाठी तो लोकांना बरे करतो. आजच्या जीवनाच्या व्यावहारिक पातळीपुरता त्याचा सल्ला योग्य असतो. पण आजची ही व्यावहारिक पातळी, हाच मुळी माणसापुढचा मूलभूत धार्मिक प्रश्न होऊन बसला आहे. हा मूलभूत प्रश्न काही तो पुढे मांडीत नाही आणि त्याचें उत्तर देण्याचाहि प्रयत्न करीत नाही.

आज ख्रिश्चन चर्चमध्ये जाणारांची वाढती संख्या दिसत आहे किंवा ख्रिश्चन धर्मोपदेशकांच्या प्रवचनांना वाढत्या प्रमाणात गर्दी होत आहे, हे खरे आहे. परंतु याचा अर्थ एवढाच आहे की, जीवनाची खरी धार्मिक बाजू ज्या समाजस्थितीत नष्ट झाली आहे, त्या समाजस्थितीला धार्मिकतेचे लेणे चढविण्याचा हा प्रयत्न

आहे. या धार्मिक चळवळींना समाजमान्यता मिळत आहे म्हणूनहि या चळवळीत भाग घेण्याची इच्छा अनेकांना होत आहे. शिवाय या समाजमान्य चळवळीमुळे बाह्य सुरक्षितता व मानसिक सुरक्षितता, या दोहोंचाहि लाभ होतो, म्हणून लोक तिकडे आकर्षित होत आहेत. पण या चळवळी म्हणजे आजच्या मूलभूत धार्मिक प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न, अशा स्वरूपाच्या मात्र मुळीच नाहीत.

खरे उत्तर शोधण्याचा मार्ग

पण मग या प्रश्नाला उत्तर तरी आहे का ? प्रत्येक प्रश्नाला उत्तर हे असतेच. पण पुष्कळदा हे उत्तर आपल्या आटोक्यात नसते. ज्या परिस्थितीतून बाहेर पडण्याबद्दल प्रश्न निर्माण होतो, त्या परिस्थितीतच आपण इतके खोल रुतून बसलो असतो की, त्या प्रश्नाचे उत्तर देणे कठिण होऊन बसते. परिस्थितीतील ही अगतिकता जाणून घेणे, म्हणजेच आपल्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या मार्गावर पहिले पाऊल टाकणे होय. असे करण्याऐवजी खोटया भ्रमोत्पादक उत्तरांनी खऱ्या उत्तराचा मार्ग कायमचा बंद करून टाकणे, हे अतिशय घातुक आहे. अगतिकपणाच्या जाणिवेतूनच काही प्रमाणात खरे उत्तर आपल्याला सापडू शकेल. ख्रिश्चन चर्चच्या सभांना जाणाऱ्या वाढत्या संख्येमुळे, किंवा मानसिक व्याधि बऱ्या करण्याच्या सफल प्रयोगांमुळे काही खरे उत्तर मिळणार नाही, व नष्ट झालेले सखोलतेचे परिमाण जीवनाला लाभणार नाही. परंतु हे परिमाण, ही बाजू आपल्या जीवनातून नष्ट झाली आहे आणि ती सहजासहजी काही आपल्याला मिळवता येणार नाही, या गोष्टीची खरीखुरी जाणीव झाली, तरच ती मिळविणे थोडे तरी शक्य होईल. अशी ही तीव्र जाणीव होणे, म्हणजेच सखोलतेच्या दिशेने वाटचाल करणे होय. जीवनाच्या खऱ्या अधिष्ठानापासून आपण तुटलो आहोत, याची ज्याला उत्कट जाणीव होते, तो वस्तुतः त्या अधिष्ठानाकडे परत जात असतो. हीच आज मानवाची मानसिक अवस्था आहे. आजची आपली अगतिकता धार्मिक किंवा इतर विचारप्रणाल्यांनी झाकून न टाकता, तिची अखंड तीव्र जाणीव ठेवणे, हे आज अवश्य होऊन बसले आहे. आजच्या तथाकथित धार्मिक चळवळीतून सांस्कृतिक क्षेत्रात नवनवीन प्रतिभाशाली निर्मिति होत राहिली, तर मात्र नष्ट झालेल्या सखोलतेच्या बाजूचा शोध करण्यास ती निर्मिति समर्थ होईल.

सखोल अर्थाचा नव्याने शोध

या सर्व सांगण्याचा अर्थ असा मात्र नव्हे की, परंपरागत धार्मिक प्रतीकांचा त्याग करावा. आजच्या विकृत रीतीने त्या धार्मिक प्रतीकांचा व्यावहारिक पातळी-वरचा अर्थ लावण्यात येत आहे, त्या अर्थाने मात्र ही प्रतीके संपूर्ण निरर्थक झालेली आहेत. त्यांचा असा विकृत अर्थ प्रसृत केल्यामुळेच त्यांच्यावर हल्ला चढविणे

विज्ञानाला शक्य झाले. पण हा विकृत अर्थ व ही व्यावहारिक पातळी सोडून त्या प्रतीकांचा अर्थ आपण शोधू लागलो, तर आधुनिक मानवाच्या जीवनात जो प्रश्न उत्पन्न झाला आहे, त्याला सामर्थ्यशाली उत्तर, या प्रतीकांचा नवा अर्थ प्रकट करणाऱ्या व उद्धारक अशा स्वरूपात साठला आहे असे आपणास दिसून येईल. आज धार्मिक चळवळींचे जे उत्थान दिसून येत आहे, त्यातून या जुन्या धार्मिक प्रतीकांचा नव्याने अर्थ लावण्याचे व आजच्या मानवाच्या अवस्थेवर प्रकाश पाडण्याचे सामर्थ्य जर निर्माण झाले, तर त्याचा आपल्या कला-साहित्यातून आविष्कार होऊ लागेल. आणि या आविष्कारांच्या दर्शनाने व ग्रहणाने अनेक भयभीत, शंकाकुल व निराश मानवांना आशेचा किरण सापडेल. पण त्यासाठी धार्मिक प्रतीकांचा नवा अर्थ शोधला पाहिजे. त्यांच्या जुन्या फसव्या व भ्रामक अर्थांनी मानवी मनावर नुसती भुरळ टाकता उपयोगी नाही. खऱ्या धार्मिक उत्तरांचे स्वरूप परिस्थितीचा कठिणपणा लक्षात घेऊनच सुचविलेले असते. आज सखोलतेचे परिमाण मानवी जीवनातून नष्ट झालेले असले तरीहि जुन्या धार्मिक प्रतीकांचे व त्यांनी दिलेल्या उत्तराचे खरे सामर्थ्य जिवंतच आहे. ज्यांना हे परिमाण नष्ट झाल्याची तीव्रतम जाणीव झालेली आहे, आणि ते परिमाण परत जीवनाला लाभावे यासाठी ज्यांचा उत्कट प्रयत्न चालू आहे, त्यांनाच या धार्मिक उत्तराच्या सामर्थ्याचा साक्षात्कार होईल.

('अमेरिकन रीव्ह्यू' वरून रूपांतरित— **वि. देशपांडे**)

★ ★ ★

पाप किती जन्मातील
अुभे दाराशी आतूर
जन्म सारे डोळ्यामध्ये
लोंबे कर्म खांद्यावर

मीही होअून सामोरा
दिला आतिथ्याचा हात
—पाप दाराशी घोटाळे
अुभा अुंबरा पहात

जयंत देवधर

पायवाट

पायवाट मी पायवाट मी
सरळ, वक्र, अन् खाली वरती
युगांतीहि मी कधी न थांबते
मीलन माझे क्षितीजावरती

सुख दुःखे अन् पाऊस वारे
कितीक येवो कितीक जावो
कधी न गणती केली मी तर
जातपात पुसण्याचे राहो

चंद्र कितोदा निराश होतो
सूर्य विसावा घेतो दमुनी
अथकपणे मी भटकत असते
सेवेचे पण वाण घेवुनी

सोशिकतेची जन्मदात्रि मी
कधिच कुणा सांगितले नाही
उरात रुतलेल्या पायांची
जखम कुणी पण पुसली नाहीं

विनायक खवले

आचार्य-परंपरेतील विलक्षण गुरु-शिष्य

● लेखक :- पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर, ●
विद्याभूषण, विद्यावाचस्पति

वैदिक परंपरा म्हणजे दार्शनिक आचार्यांची गुरु-शिष्य-परंपरा, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही. कारण अपौरुषेय मानली गेलेली आर्ष भाषेतील गूढ वेदविद्या मानवी कल्याणासाठी बुद्धिगम्य करण्याचे सारे श्रेय स्मृतिकार, व दर्शन शास्त्रकार यांच्याकडेच जाते; आणि हीच विद्या सर्वसामान्य माणसांच्या अंत:करणात धर्मश्रद्धेचे बीज रुजविण्याच्या हेतूने रामायण, महाभारत व पुराणे, या ग्रंथात कथारूपाने उपबृंहित झालेली आहे. पण या इतिहास-पुराणांचे जे कर्ते होते ते देखील वैदिक दार्शनिक परंपरेतील आचार्यच होते, ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

दार्शनिकांची ही आचार्य-परंपरा बौद्धधर्माच्या प्रसारानंतर, खंडित जरी नाही, तरी बरीच निष्प्रभ झाली होती, असे दिसते. ही निष्प्रभता नाहीशी करून, वैदिक दार्शनिक परंपरेला नवा प्रतिभाशालि उजळा देण्याचे महान् कार्य गौडपादाचार्य कुमारिल भट्ट, मंडनमिश्र व आद्य श्री. शंकराचार्य, यांनीच केले. पण हा नवा उजळा मिळविण्याच्या पूर्वी परिस्थिति कशा प्रकारची होती व तिला तोंड देण्यासाठी पूर्वाचार्य प्रणीत गुरु-शिष्य परंपरेला कोणती दिव्ये करावी लागली, यांचे रसपूर्ण वर्णन शांकरदिग्विजय या ग्रंथात आढळते. या ग्रंथाच्या आधारे, आचार्य कुमारिल भट्ट व त्यांचे विलक्षण बुद्धिमान शिष्य प्रभाकर, यांची कथा येथे सारांशरूपाने देण्याचे योजिले आहे.

आचार्य कुमारिल भट्ट

आचार्य कुमारिल भट्ट यांना वैदिक ज्ञान-विज्ञान-परंपरेची महति अंत:करणात प्रथमपासूनच जाणवत असावी, असे दिसते. पण त्याकाळी नामांकित पंडितांचा फार मोठा वर्ग बौद्धानुयायी झाला होता आणि दार्शनिक विद्येत ज्या तरुण जिज्ञासूंना पारंगत होण्याची इच्छा असे त्यांना बौद्ध पंडितांचेच शिष्यत्व पत्करणे भाग पडत असे. तरुण कुमारिल भट्टांनाहि हेच करावे लागले. त्यांच्या काळी पंडित श्रीनिकेतन नावाचे विख्यात बौद्ध पंडित होते. ते सुधन्वा नामक

राजाचे राजगुरूहि होते आणि त्यामुळे बौद्धधर्म हाच राजधर्म व राष्ट्रधर्म म्हणून मान्यता पावला होता. वैदिक धर्माला राजधर्माचे व राष्ट्रधर्माचे माहात्म्य प्राप्त करून देण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्यांनाहि प्रथम दार्शनिक विद्येत पारंगतता प्राप्त करून घेण्यासाठी बौद्धपंडितांना शरण जाण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. शिवाय, बुद्धमताला जे न्यायशास्त्रीय बौद्धिक अधिष्ठान प्राप्त झाले होते ते आत्मसात करून, बौद्धमताचे हे बौद्धिक अधिष्ठान न्यायशास्त्रीय पद्धतीनेच खोडून काढल्याशिवाय वैदिक दार्शनिक मताला नवी प्रतिष्ठा प्राप्त करून देणे शक्य नव्हते. या दोन्ही कारणास्तव कुमारिल भट्टांनी पंडित श्रीनिकेतनांचे शिष्यत्व पत्करले.

अशा रीतीने अनेक वर्षांच्या अविश्रांत अध्ययन– अध्यापनानंतर कुमारिल भट्ट बौद्ध– दार्शनिक विद्येद पारंगत झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या गुरुकुलाचा त्याग केला आणि बौद्धमताचे खंडन करण्यास आवश्यक ती सर्व तयारी केली. अशी तयारी झाल्यानंतर ते राजदरबारी गेले व "मला वैदिक धर्माची श्रेष्ठता आपल्याला पटवून द्यावयाची आहे. व यासाठी आपण ठरवाल त्या सर्व बौद्ध– पंडितांशी वाद करावयाची माझी तयारी आहे." सुधन्वा राजालाच वैदिक धर्माची श्रेष्ठता पटविल्याशिवाय वैदिक धर्माला भारतीय समाजात नवी व निर्विवाद प्रतिष्ठा प्राप्त होणे शक्य नाही, हे कुमारिल भट्टांनी पूर्णपणे ओळखले होते.

कुमारिल भट्टांचे आव्हान

सुधन्वा राजाने भट्टांची विनंती मान्य केली व पं. श्रीनिकेतन व इतर विख्यात बौद्धपंडित यांना पाचारण करून हा वाद घडवून आणला. राजाला हे करणे भागच होते. कारण भारतीय संस्कृतीत जी अनादिकालापासून एक प्रथा रूढ होऊन बसली होती ती अशी की, धर्म व तत्वज्ञान यांना एक युक्तिसिद्ध असे बौद्धिक अधिष्ठान आहे आणि हे अधिष्ठान, अधिक प्रभावी अशा युक्तिवादाने, खोडून काढण्याचा अधिकार सर्वांना आहे. पुरातन व सनातन वैदिक धर्माला गौतम बुद्धाच्या अवतारी विभूतिमत्वामुळे व बौद्ध पंडितांच्या अधिक रेखीव अशा न्यायशास्त्रीय युक्तिवादामुळेच अवकळा प्राप्त झाली होती. वैदिक धर्माभिमानी पंडितांना जोवर बौद्धमत अधिक रेखीव व निर्दोष अशा युक्तिवादाने खोडून काढता आले नाही, तोवर बौद्धमताचाच पगडा भारतावर कायम राहणे अपरिहार्य होते. बौद्धपंडितांचे आव्हान स्वीकारून बौद्धमत निष्प्रभ करून टाकण्यास सुमारे एक हजार वर्षांचा काळ लोटावा लागला, यावरून बौद्धपंडितांनी बुद्ध–धर्माला किती भक्कम बौद्धिक अधिष्ठान प्राप्त करून दिले होते, हे स्पष्ट होते. हे असे का घडले, याची अनेक कारणे आहेत. पण मुख्य कारण म्हणजे, भगवान गौतम-बुद्धांच्या अवतारी विभूतिमत्वाने तत्कालीन वैदिक पंडितच प्रभावीत झाले व

त्यांनीच बौद्धमताला भक्कम बौद्धिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. शिवाय, बौद्ध-मताचा स्वीकार करणे म्हणजे धर्मांतर करणे नव्हे, असाहि समज त्याकाळी रूढ असावा असे दिसते. कारण खुद्द गौतमबुद्ध हे वैदिक धर्मीयच होते व 'वैदिक धर्म खोटा आहे म्हणून मी नवा धर्म प्रस्थापित करीत आहे' अशी भूमिका त्यांनीहि घेतली नव्हती. त्यांनी जे 'धर्म-चक्र' प्रवर्तित केले ते कर्मकांडाच्या अतिरेकामुळे वैदिक सनातन धर्माला जी ग्लानि आली होती ती दूर सारण्याच्या हेतूनेच केले, असा खरा इतिहास असावा असे दिसते.

भगवान बुद्धाच्या प्रयाणानंतर मात्र त्यांच्या अनुयायांनी बौद्धधर्म हा वैदिक सनातन धर्माहून भिन्न आहे, अशी भूमिका घेऊन, बौद्धधर्माचा, सनातन वैदिक परंपरेला खंडित करणारा प्रचार केला. आणि बहुतांश नामांकित वैदिक पंडित बुद्धाच्या महान् विभूतिमत्वामुळे पूर्वीच आकर्षित केले गेल्यामुळे, बौद्धमत हे सनातन वैदिक धर्माहून भिन्न व स्वतंत्र आहे, अशा मताला जी प्रतिष्ठा लाभली तिचे निराकरण करू शकणारे प्रतीभाशालि पंडित वैदिक परंपरेत दुर्मिळ झाले.

कुमारिल भट्टांच्या पूर्वीच हे बौद्धमत खंडनाचे कार्य श्री गौडपादाचार्य यांनी केले होते. पण तत्कालीन राजांना ते पटवून वैदिक सनातन धर्माला राजधर्माचे व राष्ट्रधर्माचे स्वरूप प्राप्त करून देण्याचे कार्य अद्याप अपुरे राहिले होते. हेच कार्य कुमारिल भट्टांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने व दिव्य वैदिक धर्मनिष्ठेने पूर्ण केले.

सुधन्वा राजाने जो वाद घडवून आणला त्यांत आचार्य कुमारिल भट्ट विजयी झाले, असा निर्णय राजानेच दिला व 'आता वैदिक धर्माचाच स्वीकार करणे व त्यालाच राजधर्म व राष्ट्रधर्म म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, हे माझे कर्तव्य आहे,' अशी घोषणाहि त्याने केली.

बौद्ध पंडितांचा दुराग्रह

राजाचा निर्णय बौद्धपंडितांना मान्य करावाच लागला. आपणास आचार्य कुमारिल भट्टांनी वादात पराभूत केले ही गोष्टहि त्यांनी मान्य केली. तरीपण वाद जिंकणे हे केवळ बुद्धीचे कौशल्य आहे; त्यामुळे बौद्धधर्म हा त्याज्य व वैदिक धर्म हा स्वीकार्य वा श्रेष्ठ ठरत नाही, असा युक्तिवाद करून, राजाला बौद्ध पंडित म्हणाले, "धर्म ही एक दिव्य अशी विश्वशक्ति आहे. आचार्य कुमारिल भट्ट जर वैदिक धर्माच्या दिव्य शक्तीचे प्रात्यक्षिक करून दाखवितील, तरच राजाने वैदिक धर्माची श्रेष्ठता मान्य करावी व आम्हीहि ती मान्य करू."

राजाला हे आवडले नाही. पण बौद्धपंडितांचे हे म्हणणे अमान्य करणेहि त्याला जड वाटले. कारण बौद्धधर्म हा राजधर्म होता. प्रजेतहि त्याबाबतची श्रद्धा दृढमूल झालेली होती. कुमारिल भट्टांनी एखादे दिव्य करून दाखविल्यास वैदिक

धर्माला प्रजेचीहि मान्यता मिळविणे सोपे जाईल, म्हणून राजाने कुमारिल भट्टांना त्याबाबत विचारले असता, आचार्य म्हणाले, "बौद्ध पंडित सांगतील ते दिव्य करून दाखविण्यास माझी तयारी आहे."

याबाबत भवति–न– भवति होऊन असे ठरले की, राजधानीच्या जवळच असलेल्या एका डोंगराच्या उंच कड्यावरून कुमारिल भट्टांनी उडी टाकावी. "ते जर सुरक्षित राहिले तर वैदिक धर्माची श्रेष्ठता आम्ही मान्य करू," असे बौद्ध– पंडितानी आश्वासन दिले.

आचार्य कुमारिल भट्ट हे दिव्य करून दाखविण्यास तयार झाले. ते त्या उंच कड्यावर चढले. राजा व हजारो प्रजाजन ते दिव्य पाहण्यास जमा झाले होते. खाली उडी टाकण्यापूर्वी आचार्य कुमारिल भट्ट म्हणाले,–

"यदि वेदाः प्रमाणं स्युः धर्माधर्मविनिर्णये"– तर माझा देह सुरक्षित राहील व माझ्या जीविताला हानि पोचणार नाही." असे म्हणून त्यांनी निःसंकोचपणे उडी टाकली. खाली पडताच त्यांच्या देहाच्या चिंधड्या उडतील, असेच सर्वांना वाटत होते. पण ते खाली पडले व तात्काळ उठून उभे राहिले ! सर्व लोक आश्चर्याने थक्क झाले !

"आचार्य कुमारिल भट्ट विजयी झाले" असा डांगोराहि पिटला गेला. बौद्धपंडितांनाहि आता विरोध दाखविणे अशक्य झाले. पण याबाबत अधिकृत घोषणा करण्यापूर्वी कुमारिल भट्टाची अनुमति घेण्यासाठी राजा त्यांच्याजवळ गेला असता, आचार्य म्हणाले, "मी विजयी झालो हे खरे, पण वैदिक धर्माच्या दिव्य विश्वशक्तीचा जो प्रत्यय मी अपेक्षिला होता त्यात थोडी कसर बाकी राहिली आहे. माझा देह व जीव सुरक्षित राहिला हे खरे व ही वैदिक धर्माच्या दिव्य शक्तीचीच करामत आहे, यात शंकाच नाही. तरीपण हा विजय निष्कलंक नाही."–असे म्हणून आचार्यांनी राजाला आपल्या भुवईच्या बाजूला खरचटल्याचे चिन्ह दाखविले. आचार्य म्हणाले, "मला याचे कारणहि कळून चुकले आहे. मी "यदि वेदाः प्रमाणं स्युः"– अशी भाषा वापरून वेदाविषयी किंचित्‌शी शंकाच प्रदर्शित केली. म्हणून मला हे दिव्य पुन्हा एकवार केलेच पाहिजे. वेदांची दिव्य विश्वशक्ति निष्कलंक व पूर्ण अभय देणारी आहे, हेच मला आता सर्वांना सिद्ध करून दाखवावयाचे आहे."

असे म्हणून आचार्यांनी पुन्हा एकवार त्या उंच कड्यावरून खाली उडी घेतली. पण उडी घेण्यापूर्वी ते म्हणाले, "वेदाः एव प्रमाणं स्युः–" वेदावर अशी निःशंक श्रद्धा ठेवून त्यांनी आपले प्राण पुन्हा एकवार पणाला लावताच, त्यांनी अपेक्षिला होता तोच प्रत्यय त्यांना आला. यावेळी त्यांच्या शरीराच्या कोणत्याहि अंगाला रेसभराचीहि इजा झाली नाही !

अनुक्रमणिका

आणखी एक दिव्य

बौद्ध-पंडितांना आपले काळोखी भवितव्य आता स्पष्टपणे दिसू लागले. त्यांनी आपसात चर्चा करून असे ठरविले की, कुमारिल भट्टांनी करून दाखविलेल्या दिव्याची वाफ उडवून लावावयाची. ते राजाकडे गेले व म्हणाले, " आचार्य कुमारिल भट्टांनी केलेले दिव्य हे खऱ्या अर्थाने धार्मिक स्वरूपाचे नसून, मणि-मंत्रादि सिद्धी प्राप्त झाल्या असता, ही अशी दिव्ये, धर्मावर श्रद्धा न ठेवणाऱ्या योग्याला देखील करून दाखविता येणे अशक्य नाही. म्हणून आचार्यांनी वैदिक धर्माची निरपवाद श्रेष्ठता सिद्ध केलेली नसून, यौगिक सिद्धीचेच प्रदर्शन करून दाखविले आहे."

राजाला हे ऐकून मनात फार संताप आला. तरीपण त्या पंडितांची तोंडे निर्विवादपणे बंद करण्याची आवश्यकताहि त्याला भासली.

त्याने बौद्ध पंडितांना सांगितले की, " ठीक आहे. आता मीच एक अशी परीक्षा घेणार आहे की, तीत जे कसास उतरतील त्यांनाच माझ्या राज्यांत प्रतिष्ठा राहील. जे कसास उतरणार नाहीत त्यांना फासावर लटकावण्यांत येईल."

प्रश्न ' दिव्य ' खरे की खोटे, असा नसून, भारतात बौद्धधर्म राहणार की सनातन वैदिक धर्म राहणार, अशा स्वरूपाचा होता. व यासाठी उभय पक्षांच्या पंडितांनी आपले प्राण पणास लावण्याचा निर्धार केला होता. राजाला आचार्य कुमारिल भट्टांचा केवळ बौद्धिक विजयच नव्हे, तर वैदिक धर्माची यथार्थताहि पूर्ण पटली होती. पण राज्यात, " बौद्ध-विरुद्ध-सनातन वैदिक धर्म "-असे बंड माजू नये म्हणून राजाने एक विलक्षण परीक्षा नियोजित केली. रात्री अगदी पूर्ण एकांतात त्याने एका मोठ्या मडक्यात काही तरी ठेवले व आपल्या हातांनी त्याचं तोंड अगदी सीलबंद करून टाकले. दुसऱ्या दिवशी उभय पक्षांच्या पंडितांना बोलावून त्यांना सांगितले की, " यांत मी स्वतः कांहीतरी आपल्या हाताने ठेविले आहे. ते काय आहे हे माझ्याशिवाय अन्य कोणालाहि माहित नाही. कारण ती वस्तु आत घालून या मडक्याचे तोंड मी माझ्या हातांनीच सीलबंद करून टाकले आहे. यात काय आहे हे, जो पक्ष बिनचुकपणे ओळखील त्याचा विजय होईल. जो ओळखणार नाही त्याच्या म्होरक्यांना फासावर चढावे लागेल"

उभय पक्षांच्या पंडितांनी एकदोन दिवसांचा वेळ मागितला व तो त्यांना देण्यात आला. या अवधीत उभय पक्षांच्या ज्योतिषांनी फलज्योतिषाच्या शास्त्राधारे राजाच्या मडक्यात कोणती वस्तु असावी, याचे भविष्य वर्तविण्यास कुंडल्या मांडल्या. बौद्धपक्षाकडील ज्योतिषि अधिक निपुण असल्यामुळे त्यांनी मडक्यात कोणती वस्तु आहे, हे नक्की शोधून काढले. कुमारिल भट्ट-पक्षाच्या वैदिक ज्योतिषांना नक्की काय ते सांगता आले नाही. परीक्षा उद्यावर येऊन ठेपली.

अनुक्रमणिका

बौद्ध पक्षाचा जय होणार, याची आचार्य कुमारिल भट्टांना खात्री पटली. आता जगून तरी काय उपयोग, असे वाटून त्यांनी जलसमाधि घेण्याचा निर्णय घेतला. हातात पाणी घेऊन ते सूर्य नारायणाला म्हणाले, "हे भगवन्, सनातन वैदिक धर्माला भाग्याचे दिवस लाभावे, अशी आपलीच इच्छा दिसत नाही. म्हणून राजाच्या फासावर लटकण्यापेक्षा मी स्वेच्छेनेच हे मरण पत्करीत आहे."

असे म्हणून देह पाण्यात सोडणार तोच आचार्यांना आकाशवाणी ऐकू आली, "हे ब्रह्मन्, घावरू नका. वेदांची शक्ति अपार आहे. तू राजाला जाऊन सांग की, त्या मडक्यात भगवान् शेषशायी बसले आहेत."

आचार्यांनी ही आकाशवाणी शिरसावंद्य मानली व ते राजदरबारात गेले. राजाने प्रश्न करताच, बौद्धपंडित म्हणाले, "मडक्यात मेलेला साप आहे." आचार्यांना विचारताच ते म्हणाले, "मडक्यांत भगवान् शेपशायी बसले आहेत."

राजा घावरून गेला. त्याला आचार्य कुमारिल भट्टांचा विजय व्हावा, असे मनापासून वाटत होते. म्हणून राजा त्यांना म्हणाला, 'आपण आणखी थोडा अवधि घ्या व मग मला उत्तर द्या. तोवर मी या मडक्याचे तोंड उघडणार नाही.'

आचार्य म्हणाले, "हे राजन्, वैदिक धर्मावर श्रद्धा असलेला ब्राह्मण आपला वाग्बाण परत घेत नसतो. माझे काय वाटेल ते होवो. मी माझे उत्तर बदलणार नाही."

राजाच्या तोंडचे पाणी पळाले. त्याला अत्यंत वाईट वाटले. ज्याचा सत्पक्ष आहे, ज्याने आपला सत्पक्ष एक दिव्य करूनहि सिद्ध केला आहे, त्याचा आता पराभव होणार, हे पाहून राजा अत्यंत व्यथित झाला. पण तितक्यात त्याला आकाशवाणी ऐकू आली; "हे राजा, वेदावर श्रद्धा ठेवणाऱ्या ब्राह्मणाचा शब्द खोटा करण्याची शक्ति परमेश्वरात देखील नाही. तू निःशंकपणे मडक्याचे तोंड उघड. तुला हवे आहे तेच घडून येईल."

राजाने उभय पक्षांच्या समक्ष मडक्याचे तोंड उघडले. राजाने त्यात मेलेला सापच ठेवला होता. पण आश्चर्य हे की, मडक्याचे तोंड उघडताच शेपशायी भगवानच त्यात बसलेले सर्वांना दिसून आले !

कुमारिल भट्टांची विलक्षण गुरुभक्ति

आचार्य कुमारिल भट्टांचा जय झाला. या विजयासाठी त्यांना भयानक दिव्यातून जावे लागले. आरंभीच घोषित केल्याप्रमाणे, पं. श्रीनिकेतन व त्यांचे प्रमुख सहकारी बौद्ध पंडित यांना राजाने फासावर लटकविले. राजाने स्वतः सनातन वैदिक धर्माची रीतसर दीक्षा घेतली व या धर्माला राजधर्माची व राष्ट्र-धर्माची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

हे सर्व घडून आल्यानंतर आचार्य कुमारिल भट्टांना पूर्ण समाधान लाभले होते; तरी एक शल्य त्यांच्या अंतकरणांत सतत बोचत राहिले. किती झाले तरी त्यांनी बौद्ध राजगुरु पं. श्रीनिकेत यांचे शिष्यत्व पत्करले होते. त्यांच्या प्रसादा-मुळेच दार्शनिक विद्येत ते पारंगत झाले होते. तीच विद्या अधिक परिणत दशेला नेऊन त्यांनी सनातन वैदिक धर्माला पुन्हा एकवार पुरातन प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात अलौकिक यश संपादन केले. तरी पण हे करताना गुरुद्रोहाचे व गुरुवधाचे पातक त्यांच्या हातून अपरिहार्यपणे घडलेच होते. या पापाचे परिमार्जन केल्या-शिवाय आपल्याला मोक्ष लाभणे शक्य नाही, ही गोष्ट ते कधीहि विसरू शकले नाही. कारण शास्त्रात गुरुद्रोह करणे, वा गुरुवधाला कारणीभूत होणे, हे महान् पातक मानण्यात आले होते. या पातकाचे परिमार्जन देहदंडाशिवाय केले जाणे शक्य नाही, असेहि धर्मशास्त्रात नमूद केलेले होते. ज्या सनातन वैदिक धर्माला त्यांनी गेलेली प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती, त्याच धर्माचा असा आदेश होता की, गुरुद्रोहाच्या पातकाचे परिमार्जन केलेच पाहिजे.

म्हणून आचार्य कुमारिल भट्टांनी, आपले संकल्पित कर्तव्यकर्म पार पाडल्या-नंतर, स्वतःच अग्निप्रवेश करण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी साळीच्या कुसांचा ढीग रचून चिता तयार केली. आणि या चितेवर बसून स्वतःच्या हातांनीच ती पेटविणार इतक्यात आद्य श्री शंकराचार्य तेथे जाऊन पोचले व त्यांनी अद्वैत मताबाबत वाद करून ते सिद्ध करून दाखविण्याची आपली इच्छा प्रकट केली. आचार्य कुमारिल भट्ट म्हणाले, "गुरुद्रोहाच्या पातकाचे परिमार्जन करण्याकरता मी अग्नि प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. तुमच्याशी वाद करून जय वा पराजय झाला, तरी त्यानंतरहि हे दिव्य मला करावेच लागणार. सनातन वैदिक धर्माचे पुनरुत्थान झालेच आहे. या धर्माचे अंतिम अधिष्ठान द्वैती की अद्वैती, हा प्रश्न महत्वाचा असला, तरी त्याचा निर्णय लावून घेण्यासाठी तुम्ही माझे शिष्य, आचार्य मंडनमिश्र, यांच्याशी वाद करावा. हा वाद करण्यास माझ्या इतकेच ते समर्थ आहेत."

असे म्हणून आ. कुमारिल भट्टांनी आपल्याच हातांनी ती चिता पेटविली व शांतपणे आपल्या देहाचे त्या मंत्राग्नीत विसर्जन केले !

● ● ●

पुढे आद्य श्री शंकराचार्य व आचार्य मंडनमिश्र यांच्यात वैदिक धर्माचे अधिष्ठान द्वैत की अद्वैत, याबाबत वाद होऊन त्यात श्रीशंकराचार्य विजयी कसे झाले, हे सर्वास सुपरिचित आहे. शंकरांनी हा वाद एवढ्याचसाठी केला असावा की, द्वैतमतावर सनातन वैदिक धर्माची उभारणी कर्मकांड्यांनी केली होती म्हणूनच बौद्धमतापुढे या धर्माला शतकानुशतके निष्प्रभ होऊन काळ कंठावा लागला

अनुक्रमणिका

होता. याची पुनरावृत्ति होऊ नये, यासाठीच आद्य श्री शंकराचार्यांचा अवतार झाला होता व त्यांनी हे अवतार–कार्य ज्या अलौकिक व अतुलनीय प्रतिभेने केले त्याला मानवी इतिहासात तोड नाही, असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

● ● ●

आचार्य कुमारिल भट्टांची असामान्य व अति विलक्षण गुरुभक्ति कशी होती, याचे सारांशाने वर्णन या लेखात केले आहे. उत्तरार्धात आ. कुमारिल भट्टांचे अति बुद्धिमान शिष्य, आचार्य प्रभाकर, यांचे आपल्या गुरुशी कसे नाते होते, गुरुमतावर वेळोवेळी बौद्धिक चमत्कृतीने मात करून, आपल्या मतालाच ‘ गुरुमत ’ ही ‘ संज्ञा ’ त्यांनी कशी प्राप्त करून दिली व आपल्या गुरूच्या मताला केवळ ‘ भट्टमत ’ म्हणूनच कसे रूढ व्हावे लागले, याची कथा उत्तरार्धात सांगू.

* * *

संचित सरले
नुरले जीवन
गुरुत्व शोधून थकलो मी

सुन्न क्षितिजाशी
ढगाळले नभ
निराशेचा कोंब पिसाटला

शेवटी थिजून
वसता संचित
पोलादाची भिंत ढासळली

मनाचा आरसा
येताच सामोरा
देव नि देव्हारा झालो मीच

जयन्त देवधर

ज्ञानेश्वरीच्या दृष्टिकोणातून– श्रीकृष्णाचे तत्वज्ञान

● लेखक:– पु. य. देशपांडे ●

'श्रीमत्–भगवत्–गीता' हा एक असा विलक्षण ग्रंथ आहे की, ज्याचे आकर्षण सुमारे तीन हजार वर्षापासून आजतागायत कायम आहे. या तीन हजार वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत या ग्रंथावर अनेक भाष्ये व टीका लिहिल्या गेल्या आहेत. जगातील अनेक मोठमोठ्या तत्वज्ञांनी या ग्रंथात ग्रथित झालेल्या श्रीकृष्ण-प्रणीत तत्वज्ञानाचा परामर्श घेतला आहे. हे परदेशीय विद्वानांचे परामर्श आणि आपल्या देशात भाष्यादि रूपांनी घेतले गेलेले परामर्श, यांच्यात इतकी विभिन्नता आहे की, **'श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान म्हणजे काय ?'**– या प्रश्नाचे निश्चित उत्तर कोणालाहि देता येण्यासारखे नाही. ज्या देशात हा अद्‌भुत अलौकिक व मानवी बुद्धीला कुंठित करणारा ग्रंथ निर्माण झाला, त्या या आपल्या देशातील विद्वानातहि या ग्रंथाच्या तात्पर्य–निर्णयाबाबत मतैक्य नाही. मग जगातील इतर विद्वानात आढळून येणाऱ्या मतभेदांबाबत तर बोलावयासच नको.

इतकी मतभिन्नता असताहि एका गोष्टीबाबत मात्र मैतक्य दिसून येते. ती ही की, या ग्रंथातील श्रीकृष्णप्रणीत तत्वज्ञानाचे मानवी बुद्धीला वाटणारे आकर्षण, हे मात्र स्थल–काल–परिस्थिति–निरपेक्ष असे आहे. युगायुगात आणि शतका-शतकात सामाजिक जीवनात परिवर्तन घडून येत असते. आधुनिक विज्ञानाच्या प्रभावामुळे गेल्या तीनशे वर्षात सर्व जगात घडून आलेले परिवर्तन तर इतके नवे व विलक्षण आहे की असे परिवर्तन गत–इतिहासातील कोणत्याहि युगात घडून आले नव्हते, असे आधुनिक विद्वान सांगतात. असे असताहि, या नव्या आधुनिक युगातील अनेक विद्वानांनाहि गीतेतील श्रीकृष्णप्रणीत तत्वज्ञान पूर्वीइतकेच आकर्षक व विचारणीय वाटावे, हा एक चमत्कारच मानला पाहिजे.

गीतातत्वाची नित्य नूतनता

यावरून एक निष्कर्ष निघतो तो असा की, हे श्रीकृष्णप्रणीत गीतातत्व पुरातन असूनहि सनातन आहे, नित्यनवे असे आहे. आणि मौजेची गोष्ट ही की, या ग्रंथांचा हा जो नित्य–नवीनपणाचा अद्‌भुत विशेष त्याचे महत्व ओळखणारा

आणि या महत्वावरच विशेष भर देणारा पहिला प्रभावी व प्रतिभाशाली भाष्यकार म्हणजे श्री ज्ञानदेव.

ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच अध्यायात ज्ञानदेव म्हणतातः—

तया गीतार्थाची थोरी — स्वयें शंभू विवरी ।
जेथे भवानी प्रश्न करी — चमत्कारोनी ।। ७० ।।
तेथ हर म्हणे नेणिजे — देवी जैसें कां स्वरूप तुझें ।
तसें हें नित्य नूतन देखिजे — गीतातत्व ।।७१ ।।

श्रीकृष्णप्रणीत गीतातत्वाची ही नित्यनूतनता अखंड ध्यानात ठेवूनच श्रीकृष्णाचे तत्वज्ञान ही काय वस्तु आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे अवधान सुटले की, या तत्वज्ञानाबाबतचे आपले ज्ञान निष्प्राण झालेच. म्हणून या तत्वज्ञानावावत जी मतभिन्नता आढळते ती वस्तुतः गीतांतर्गत नित्य नूतन तत्वावावत नसून, गीतातत्वाच्या या नित्य नूतन विशेषाकडे दुर्लक्ष झाल्यामुळेच घडून आली आहे, असे सार्थतेने म्हणता येते. म्हणून, ज्ञानदेवानी आपल्या ज्ञानेश्वरीत गीतातत्वाच्या अद्भूत, अलौकिक व मानवी मति स्तिमित करून टाकणाऱ्या या व्यवच्छेदक व निर्णायक विशेषावरच अचुक बोट ठेवून, या तत्वज्ञानाचा जो 'भावार्थ प्रदीप्त' केला आहे, तोहि मूळ तत्वाइतकाच नित्य नूतन, अद्भुत, अलौकिक व मानवी मति स्तिमित करून टाकणारा व्हावा, यात काय आश्चर्य.

मी तर एक पाऊल पुढे जाऊन असे म्हणेन की, गीतेवरील अनेक भाष्ये व टीकादि प्रकार यांच्यातील भिन्नता, परस्परविरोध व मतवैचित्र्य हे गेली दोन तीन हजार वर्षे चालू राहावे आणि या देशातच नव्हे, तर जगातील सर्व देशांत व सर्वकाळात चालू राहावे, ही एकच गोष्ट, ज्ञानदेवांनी सांगितल्याप्रमाणे, गीता-तत्वाची नित्यनूतनता सिद्ध करणारी आहे. गीतातत्व हे एकच एक आणि भाष्यें टीकादि ही अनेक व भिन्नभिन्न, असा प्रकार ज्या तत्वज्ञानावावत संभवतो व देश—काल—परिस्थितितील परिवर्तनांना न जुमानता सतत चालू राहतो, त्या तत्व-ज्ञानाच्या नित्य नूतनेवावत आणखी कोणत्या पुराव्याची आवश्यकता आहे ?

आणीबाणीचा प्रसंग

गीतातत्व हे असे नित्य—नूतन असल्यामुळे गीता हा ग्रंथ ज्ञानमार्गी, भक्ति-मार्गी की, कर्ममार्गी, असा प्रश्न उत्पन्न करून, श्रीकृष्ण तत्वज्ञान हे या तीनपैकी कोणत्या तरी एकाच मार्गाचा पुरस्कार करणारे आहे व अन्यमार्गाचा निषेध करणारे आहे, अशी आग्रही भूमिका मांडणे, हे मूलतःच सदोष आहे. ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरीत हा असा प्रकार केलेला नाही, ही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. गीता म्हणजे कृष्णार्जुन संवादाच्या रूपाने श्रीकृष्णांनी अर्जुनास

सांगितलेले तत्वज्ञान, अथवा त्याला घडविलेले साक्षात्कारी विश्वदर्शन व जीवन-दर्शन. श्रीकृष्ण म्हणजे, मानवदेहधारी असे, म्हणजेच सगुण–साकारता धारण केलेले, साक्षात परब्रम्ह अथवा परमात्व तत्व. विश्वाच्या उत्पति–स्थिति–लयांच्या अनादि–अनंत आवर्तनांना नित्य अधिष्ठानभूत असलेले व नित्य–नवचैतन्याने स्फुरत असलेले विश्वात्मक तत्व, म्हणजेच श्रीकृष्ण, अशी गीतेची भूमिका आहे. याच परब्रम्ह, परमात्मत्व–तत्वाचा साक्षात्कारी बोध श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेत केलेला आहे, अशी ज्ञानदेवांचीहि भूमिका आहे. पण हा बोध ज्याला करून द्यावयाचा तो अर्जुन एका चमत्कारिक अवस्थेत गुरफटला गेला होता. ऐन युद्ध सुरू होण्याच्या आणीवाणीच्या प्रसंगी एका विलक्षण मोहात सापडून तो हतबुद्ध झाला होता, ही एक गोष्ट. आणि या अवस्थेत असतानाच तो श्रीकृष्णाला शरण गेला होता, ही दुसरी गोष्ट. या दोन गोष्टींचे अवधान कायम ठेवूनच गीतातत्वाचे स्वरूप समजून घेतले पाहिजे. मानवी जीवनात जे असे आणीवाणीचे प्रसंग येत असतात व ज्यावेळी माणसाची हतबुद्ध, असहाय व केविलवाणी अशी अवस्था होत असते, त्याचवेळी, आपल्या मर्यादितपणाच्या पार असलेल्या अशा अमर्याद शक्तीला शरण जाण्याची बुद्धि त्याला होत असते. जीवभावाच्या मर्यादितपणाची तीव्रतम जाणीव, हीच् अनंत व अमर्याद असलेल्या तत्वापुढे विनम्र होत असते. विश्वाला व जीवनाला अधिष्ठानभूत असलेल्या नियामक व विमोचक तत्वाचे साक्षात्कारी दर्शन घडावे, अशी तीव्रतम आवश्यकता ज्याला जाणवते व ही आवश्यकता भरून निघाल्याशिवाय समग्र जीवनच ज्याला अर्थशून्य वाटू लागते, तोच खरा आर्त–जिज्ञासू. अशा किंकर्तव्यमूढ पण आर्त-जिज्ञासु बनलेल्या, अर्जुनाला उपदेश देऊन सर्व मोहांपासून त्याला विमुक्त करणें, हाच श्रीकृष्णप्रणीत गीता-तत्वाचा केवळ मुख्य नव्हे, तर एकमात्र उद्देश आहे. या उपदेशाच्या प्रभावामुळे, युद्ध करू नये, अशा मोहात सापडलेला अर्जुन 'नष्टो मोहः' असा होऊन युद्ध करण्यास तयार झाला, ही या उपदेशाची केवळ एक दृश्य फलश्रुति आहे. एका अति विशाल, विश्वात्मक अशा तत्वदर्शनाचा तो केवळ अनेकांपैकी एक परिणाम आहे. हा एकमात्र परिणामच मुख्य आणि ज्या चिरंतन बोधामुळे वा साक्षात्कारा-मुळे हा एक परिणाम घडून आला, तो बोध वा साक्षात्कार व त्याच्याशी संबद्ध असे सारे काही, हे मात्र गौण, असे मानून, गीता ही कर्ममार्गाचीच पुरस्कर्ती आहे, असा निष्कर्ष काढणे, म्हणजे गीतेतील विराट विश्वदर्शनाला केवळ व्यावहारिक पातळीवर आणून मर्यादित करणे होय. हा व्यवहार त्यात आहे, हे खरे; पण हा व्यवहारच मुख्य, बाकी सारे गौण, असे अट्टाहासाने प्रतिपादणे, म्हणजे गीता-तत्वाच्या चिरंतन, नित्यनूतन अशा समग्र विश्वव्यापक जीवनदर्शनालाच पारखे होऊन बसणे होय. गीतेचा एवढाच मर्यादित अर्थ असता, तर तिचे आकर्षण केव्हाच संपुष्टात आले असते. युद्ध करण्या–न करण्याचा प्रसंग देखील ज्यांच्या

जीवनात येत नाही, अशाहि असंख्य मानवांना गीता गेल्या तीन हजार वर्षांपासून मार्गदर्शक झालेली आहे, अद्यापहि तेवढयाच प्रभावी रीतीने होत आहे. ही एकच गोष्ट गीतातत्वाच्या नित्यनूतन व्यापकतेची, दिक्कालातीत चित्स्फूर्तीची व तिच्या सर्वात्मकतेची साक्ष देत आहे.

ज्ञानदेवांनी गीतातत्वाचा जो भावार्थ सांगितला आहे, तो एकांगी व संकुचित रूपाचा नसून विश्वव्यापक, सर्वजीवनव्यापक, जीवनातील सर्व संभाव्य आणीवाणीच्या प्रसंगात, सर्व प्रकारच्या तीव्र जिज्ञासूंना नित्य नवीन भासावा, अशा स्वरूपाचा आहे. ज्ञानदेवांची ही करामत जितकी प्रतिभाशाली तितकीच अतुलनीय अशी आहे. गीतेतील चिरंतनत्वाचा व नित्यनूतनत्वाचा स्पर्श ज्ञानेश्वरीत जेवढा भासतो, तेवढा तो अन्यत्र भाणसे जवळजवळ अशक्य आहे.

तीनहि मार्ग एकात्मकच

गीतेत श्रीकृष्णानी कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग, अशा तीन्ही मार्गांचे तुल्यवल व सुसंवादी निरूपण केलेले आहे. या तीन मार्गांपैकी एकच गीतेला अभिप्रेत व अन्य गौण महत्वाचे, असे तात्पर्य काढता येत नाही. कारण ज्ञान, भक्ति व कर्म, या तीन प्रवृतींकडे तुटकपणे पाहणे, हेच मूलतः प्रमादशील आहे. याचे कारणहि उघड आहे. मनुष्य हा जितका **ज्ञानवान** प्राणी आहे, तितकाच तो **इच्छावान व कर्तृत्ववानहि** प्राणी आहे. ज्ञान, इच्छा व कृति, हे मानवाचे तीन मुख्य व विशेष असे प्राकृतिक **गुणधर्म** आहेत. हे तीनहि गुणधर्म एकाच चेतनाचे, एकाच जीवाचे आहेत. कोणत्याहि जीवात ते वेगवेगळे करून एकमेकापासून तोडून दाखविता येणे शक्य नाही. एकात्मक जीवाच्याच ह्या तीन प्रमुख प्रवृत्ति आहेत आणि म्हणून जीवबोध म्हणजे या तीन्ही प्रवृतींच्या साकल्यात्मक व सुसंगत विचाराने होणारा बोध असतो. ही प्राकृतिक वस्तुस्थिति आहे. म्हणूनच अर्जुनाला जो बोध करावा लागला तो जीवाच्या या तीन्ही अंगभूत प्रवृत्तींना अनुसरून करणे क्रमप्राप्तच होते. अर्जुनाला, युद्ध करणे ही गोष्ट, तो अव्वल दर्जाचा क्षत्रिय असताहि त्याज्य, पापमय व घृणास्पद वाटू लागावी, हेच नवल. पण हे जे नवल घडले, ते अर्जुनाचे ज्ञान–इच्छा–कृति हे जे, जीवमात्राला अंगभूत असलेले तीन गुणधर्म, ते सगळेच मोहामुळे काळवंडून गेले, मृतवत् झाले, म्हणूनच घडले. त्याचे ज्ञान काळवंडले, म्हणून त्याची इच्छा काळवंडली व त्याची इच्छा काळवंडली, म्हणून त्याची कर्तृत्वशक्ति निष्प्राणवत् झाली. त्याची केवळ कर्मप्रवृतीच किंकर्तव्यमूढ झाली व त्याची ज्ञानप्रवृत्ति व इच्छाप्रवृत्ति या मात्र पूर्वीसारख्याच तल्लख राहिल्या असे मानणे, हे जीवशास्त्र, मानसशास्त्र, इत्यादि सर्व दृष्टींनी पूर्ण असंभव व म्हणूनच असमर्थनीय आहे. म्हणून अर्जुनाला जो बोध करावा लागला तो ज्ञान–इच्छा–कृति या तीन्ही जीवमात्राच्या अंगभूत गुणधर्मांना अनुलक्षूनच

अनुक्रमणिका

करावा लागला आणि हे असे करावे लागले म्हणूनच ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग, या तीन्ही मार्गांचे तुल्यबल व परस्पर सुसंवादी असे निरूपण करणेहि क्रमप्राप्त झाले.

ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीत या तीन्ही मार्गांचे जे निरूपण आढळते ते जीवाच्या ज्ञान–इच्छा–कृति–युक्त अशा एकात्मजीवभावाला एकांगी धक्का न देता करण्यात आलेले आहे, हा ज्ञानेश्वरीचा आणखी एक विशेष आहे. हा विशेष श्रीकृष्णप्रणीत तत्वज्ञानाशी पूर्ण–सुसंगतच नव्हे, तर त्यावर प्रतिभाशालि प्रकाश पाडणाराहि आहे.

ज्ञानेश्वरीची अपूर्वता

ज्ञानेश्वरी ही 'व्यासांचा मागोवा घेत–भाष्यकारांते वाट पुसत'–अशा रीतीने लिहिली गेली असली, तरी तीत व्यासांनी व आद्य श्री शंकराचार्यांनी जे पूर्वीच सांगितले त्याहून अधिक व नवे असे काहीच सांगितले नाही, अशा आशयाचे एक मत काही मान्यवर विद्वानात रूढ होऊन बसले आहे. श्री शंकराचार्यांप्रमाणेच ज्ञानदेव हे अद्वैत सिद्धांतानुगामी होते, यात शंकाच नाही. पण ज्ञानदेव हे अद्वैत सिद्धांतानुगामी होते म्हणून आद्य शंकराचार्यांपेक्षा नवीन असे त्यांनी काहीच सांगितले नाही, असे म्हणणे मात्र योग्य होणार नाही. कारण प्रत्येक तत्वज्ञान-प्रकाराला व त्याच्या मांडणीला विकास संभवतो. आणि अद्वैतसिद्धांतदेखील याला अपवाद नाही. ज्ञानेश्वरी या ग्रंथातील तत्वज्ञान अद्वैतवादी असले, तरी या तत्वज्ञानात ज्ञानदेवांनी आठ प्रकारची अगदी नवी अशी भर कशी घातली आहे, याचे मार्मिक विवरण गुरुदेव रामभाऊ रानडे यांनी आपल्या The Bhagavad Gita–As a Philosophy of God Realisation या ग्रंथात केले आहे. मी याच्याहि पुढे जाऊन असे नम्रपणे सांगू इच्छितो की, ज्ञानेश्वरी हा, गीता-तत्वदर्शनाच्या बाबतीत, म्हणजेच श्रीकृष्णप्रणीत तत्वज्ञान–दिग्दर्शनाच्या बाबतीत, आरंभापासून अखेरपर्यंत अपूर्व असा ग्रंथ आहे. अद्वैत सिद्धांताची तार्किक व बौद्धिक बैठक समजून घेण्याकरता गौडपादाचार्य व आद्य श्री शंकराचार्य यांनाच शरण गेले पाहिजे, यात शंकाच नाही. पण अद्वैत तत्वज्ञानाची व श्रीकृष्णप्रणीत गीता-तत्वाची सजीव चैतन्याने मुसमुसलेली, नवनवोन्मेषांनी बहरलेली, विविधप्रकारच्या वृत्तीनिवृत्तीचे अद्वैत चित्प्रभेशी चिद्विलासमय मीलन घडविणारी, अशी आंतरिक साक्ष ज्यांना पटवून घ्यावयाची असेल, त्यांना ज्ञानदेवांनाच शरण गेले पाहिजे.

अद्वैत तत्वज्ञानाची महति

गीतेतील श्रीकृष्णप्रणीत तत्वज्ञान हे अद्वैत तत्वदर्शन आहे. हे अद्वैत म्हणजे काय, याचा बोध सहजासहजी होत नसतो. त्यासाठी प्रथम आणीबाणीच्या प्रसंगाचा अनुभव यावा लागतो. अशा अनुभवामुळे आपल्या जीवभावाच्या मर्यादा तीव्रतेने

जाणवाव्या लागतात. आपले समग्र प्रारब्ध घटित जीवन हे, आहे–नाही, भाव-अभाव, ज्ञान–अज्ञान, सुख–दुःख, इत्यादि द्वंद्वांच्या परीघातच कसे वारंवार घुमत राहते; अज्ञानजन्य व क्षुद्र वासनाजन्य अशा नवनव्या भ्रमवलयातच ते कसे भ्रमण करीत राहते; आणि या भ्रमांच्या नवनव्या भासणाऱ्या सरणीलाच 'प्रगति' मानून आपण आपली दिशाभूल कशी करवून घेत असतो, याची तीव्र जाणीव झाल्याशिवाय, जीवनाच्या अनंत, अमर्याद व नित्य चिन्मय अशा अधिष्ठानाचा शोध घेण्याची बुद्धीच माणसाला होत नाही. पण ही अशी बुद्धि, तीव्र जिज्ञासेमुळे उदयास येताच द्वंद्वातीत, सर्व भेदातीत अशा तत्वाची ओढ जीवाला लागते. ही ओढ ज्याला लागली असेल त्याला गीतेतील अद्वैत–सूर्याचे, चित्सूर्याचे साक्षात्कारी दर्शन, गीताप्रणीत मार्गाचे अनुसरण करताच, कसे घडते, याची चिन्मय जाणीव करून देणारा तेजस्वी व प्रतिभाशालि ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी.

ईश्वरी ज्ञान देणाऱ्या ज्ञानेश्वरी–कारांना त्यांच्याच पावन व प्रतिभा वाणीत वंदन करून, आपण हा छोटासा वाग्यज्ञ आटोपता घेऊ.

मावळवीत विश्वभास–नवल उदयला चंद्रांश ।
अद्वयाब्जिनी विकाश–वंदूं आतां ।।
जो अविद्यारातीं रूसोनिया–गिळी ज्ञानाज्ञान चांदणियां ।
जो सुदिन करी ज्ञानियां–स्व-बोधाचा ।।
जेणें विवळतिये सवळे–लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।
सांडिती देहाहंतेचीं अविसाळें–जीवपक्षी ।।

तो अहोरात्रांचा पैलकड–कोणें देखावा ज्ञानमार्तंड ।
जो प्रकाश्येंवीण सुरवाड–प्रकाशाचा ।।

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने– ध्वनिक्षेपन दि. २४-९-६०)

टीपः– गेल्या नोव्हेंबर दिनांक १६ ला श्री ज्ञानदेवांची पुण्यतिथी सर्व महाराष्ट्रांत या वर्षी विशेष उत्साहाने साजरी केली गेली. त्यानिमित्त ज्ञानदेवांना आमची अल्पशी श्रद्धांजलि म्हणून हा लेख आम्ही प्रकाशित करीत आहोत.

–संपादक

★ ★ ★

अनुक्रमणिका

साहित्य समीक्षा

भेटीगाठी

[समीक्षक– प्रा. राम शेवाळकर]

'भेटीगाठी' हा शंकर पाटलांचा दुसरा कथासंग्रह. ग्रामीण जीवनाचे औरस चित्रण करणारी जी कथाकार मंडळी माडगूळकरांच्या मागोमाग लिहू लागली, त्यांत शंकर पाटील यांची गति लक्षणीय आहे. खेड्याकडील रांगड्या जीवनातील बोलके क्षण अचूक टिपण्याचे त्यांचे सामर्थ्य 'वळीव' या संग्रहात पहिल्यांदा प्रकट झाले. खेड्यातील निरक्षर, असंस्कृत लोक, त्यांची पीळदार मने, जीवन झाकोळून टाकणाऱ्या रूढ समजुती व श्रद्धाकेंद्रे, निधडे, सरळसोट, रगेल व रंगेल आचार-विचार, नागर जीवनापासून स्पष्ट व्यवच्छेद सिद्ध करणारे स्वभाव व भाषाविशेष – यांचे डोळस निरीक्षण व त्याचे सहृदय नि समजपूर्ण चित्रण त्यांच्या पहिल्याच कथासंग्रहाने प्रत्ययास आणून, वाचकांस आस्थेवाइकपणे वाचावयास लावणारे आश्वासन आपल्यात असल्याचे सिद्ध केले. म्हणून त्यांच्या दुसऱ्या संग्रहाबाबत साहजिकच सापेक्ष उत्सुकता निर्माण झाली.

ही उत्सुकता तृप्त करण्यात पाटील या संग्रहात काही अंशी निश्चितच यशस्वी झाले आहेत. कथेला 'ग्रामीण' म्हणून वेगळेपणा लाभण्यासाठी प्रामुख्याने मनुष्यस्वभाव व भाषा यांची ठळक वैशिष्ट्ये नीट लक्षून ती सजीवपणे साकार करण्यात यश यायला हवे. नेहमीच्या त्याच त्या व यांत्रिक जीवनपद्धतिमुळे नागर समाजात येणारा निःसत्व गुळगुळीतपणा खेड्यात आढळत नाही. तेथील व्यक्तित्वांचे कोपरेहि झिजलेले नसतात. त्यामुळे स्वभावाप्रमाणेच त्यांची भाषाहि उघडीवाघडी, थेट अर्थव्यक्ति करणारी व टोकदार असते. मूळभूत समान मानवी समस्या सोडल्या, तर ग्रामीण जीवनाला व्याकुळ करणाऱ्या प्रश्नांचे स्वरूपहि आपल्यांला कित्येकदा अनोळखी असते. पण या विश्वाची नीट समज आली नसली, व आवश्यक ते भान राखले न गेले, तर बाकी हे प्रश्न, स्वभाव व भाषा यांची व्यवच्छेदक वैशिष्ट्ये टिपून घेण्यात कथा आपले कथापण हरवून बसते, नि मग मासलेवाईक नमुन्यांची व खेडवळ भाषेची अपूर्वाईच भाव खाऊन जाते. मनुष्य-स्वभावाचे नवाडे नमुने, व अपरिचित रानशब्दांची पखरण, यामुळे ग्रामीण कथा-वाङ्मयावर नको त्या मर्यादा पडतात. भाषेमध्ये ते ते प्रादेशिक जीवन ओथंबलेले असते, त्याचा साकल्यपूर्ण व सजीव स्पर्श अशा कथांमध्ये जाणवायला हवा.

शंकर पाटलांच्या कथेतील पात्रे, शब्द व निसर्ग सुद्धा आपले प्रादेशिक भान

विसरत नाहीत, ही आशास्पद बाब आहे. ग्रामीण जीवनात, भडव्या, येड्झव्या, लाजमुडे, खडम्या या व यासारख्या शिव्यांना नागर मनावर काटे उभे करण्यासारखे शिवीपण मुळी नसतेच. या शिव्या ग्रामीण बोलीचे एक आवेशपूर्ण पण अपरिहार्य अंग बनून राहिल्या असतात. तिथे कुणाहि म्हादानं जांभळं खायची इच्छा बोलून दाखविली, की कुणाहि परशाकडून त्याची 'हद् लेका' काय गरवार हैस काय ? दिसलं ते मागतोस डोहाळं लागल्यागत. अशाच शब्दात निर्भत्सना होणे स्वाभाविक व अपेक्षित असते. 'लोडणा' झालेल्या बायकोला तियला बाजीराव हाल हाल करून शेवटी विहीरीत ढकलून मोकळा होतो, शेतकी– अधिकाऱ्याकडून आलेलं खताविषयीचं साधं पत्र 'खलिता' बनून तियल्या हरिवाच्या अडाणी संसारात एकदम उलथापालथ करते, एखादा डबऱ्यातला काका आपल्या टॉयफाईडने आजारी असलेल्या डिगाला औषधाचा थेंब न देता, खच्चून जेवायला घालून त्याचा 'शेर' संपवायला मदत करतो, बैलांच्या शिंगामधून 'व्हला' गेला की तियल्या कोणत्याहि कुटुंबात अशुभ टळवण्यासाठी खटपटींचा आटापिटा केला जातो, तिथ मरणाची सूचना जोतिबाच्या डोंगरावरील नागाच्या दर्शनाने दिली जाते;– असे हे विविध रासवट वैशिष्टयांनी गजबजलेले ग्रामीण जीवन लेखकाने उचित शब्दांमध्ये गुंतवलेले आहे. असे हे जीवन, हेडेगिरी, ढेलजेवर, फकस्त, रिंदिसा, हुरुट, वळंवा, कडंका, वाजाप, तुरगूमुरगू, चगाळा चौसा, इरनाला, ताटुक, येखाळी;– असल्या शब्दांच्या, वहात, अडशिरीनं, येडबडणे, श्रंग, भेलकाडू लागणे, झेंडू फुटणे, भांगलणे इ. वाक्प्रचारांच्या मदतीविना बोलके होऊच शकले नसते, यांची वाचकाकडून कबूली घेऊनच पाटलांची कथा संपते.

टगेगिरी व इरसालपणाचे नमुने परशा, सरावण्या मांग, यांच्याद्वारे, लेखकाने परिणामकारकपणे रेखाटले आहेत. काही ठिकाणी नागर अभिव्यक्तिची परीटघडी खटकते, कुठेकुठे ग्रामीण शब्दप्रदर्शनाचा हव्यास पोरका पडल्यासारखा वाटतो, काही व्यक्तिदर्शने अंतकरणापर्यंत जाऊन पोचण्याच्या बाबतीत असफल ठरतात, काही वर्णनेहि कथाविषयाचे बोट सुटून भलतीकडे भरकटतात, माडगूळकरांच्या 'व्यंकटा' प्रमाणे पाटलांचा 'बाळासाब'हि पुन्हापुन्हा येऊन भेटतो आणि आत्मप्रदर्शनाची हौस स्प्रिंग बाहेर आलेल्या कोचासारखी त्रासदायक होते. एवढे सोडले तर पाटलांचे कथाविश्व ग्रामीण जीवनाचे यथार्थ प्रतिनिधित्व करतात, हे कबूल केले पाहिजे.

ग्रामीण कथेच्या कक्षा पाटलांनी दोन ठिकाणी बेधकपणे ओलांडल्या आहेत. 'पोर' या कथेची अखेर साधताना व अखेरच्या संपूर्ण 'भेटीगांठी' या कथेत. भेटीगाठी ही कथा अस्तगामी व उदयोन्मुख अशा दोन पिढ्यांमधील खिन्न करणारी

अनुक्रमणिका

मानसिक व भावनिक तफावत भेदकपणे स्पष्ट करते. बाळाईच्या मृत्युशय्येभोवती वावरणाऱ्या त्या दोन वृत्तींमधील अंतराचे हे दर्शन विलक्षण प्रत्ययकारी उतरले आहे. या कथेने पाटलांच्या कथेला ग्रामीण विश्वाच्या शिवेवर आणून पोचवले आहे. या गौरवप्रद वर्तुळातून बाहेर पडण्याची प्रसादचिन्हे या शेवटच्या कथेत उमटलेली दिसतात, हे या संग्रहाचे आणखी डोळचात भरण्याजोगे यश.

भेटीगाठी (कथासंग्रह) लेखक– शंकर पाटील
साधना प्रकाशक, पुणे २; पृष्ठे १५२ किंमत रु. ३–५०

* * *

सोसवेना आता
दूरतेची कळ
भावनेचे बळ
सरो आले

दिसावा आकाशी
कुठे मेघ काळा
कोरडला गळा
ओलवावा

पिऊन काळोखी
होईन बावळा
अभंगाचा चाळा
दुणावेल

जयन्त देवधर

श्री समर्थांचे राजकीय तत्त्वज्ञान

(उत्तरार्ध)

लेखक:– प्रा. श्री. गो. काशीकर

धर्मस्थापना यातच रामदासांच्यामते स्वराज्य–स्थापना अंतर्भूत होती. ही स्वराज्यस्थापना कशी घडवून आणावयाची हा प्रश्न समर्थांनी अत्यंत स्वतंत्र प्रज्ञेने व वास्तववादी दृष्टीने हाताळला आहे आणि सामूहिक जनजागृतीचे एक नवीनच आचारतंत्र निर्माण केले आहे. 'सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥१२-९-१७॥' हे त्यांच्या आचारतंत्राचे मुख्य सूत्र आहे. राजकारण हे देशकाल परिस्थितिसापेक्ष असते हाच आधुनिक सिद्धांत यातून दृगोचार होतो.

समर्थांचा प्रचीतिवाद

समर्थांच्या ह्या आचारतंत्राला प्रचीतिवाद किंवा प्रत्ययवाद असे नाव देता येईल. समर्थांच्या स्वतःच्या जीवनातून व स्वानुभवातून तावून सुलाखून हा प्रचीतिवाद जन्माला आला आहे. प्रचीति किंवा प्रत्यय हा तद्रूप व प्रामाणिक अंतःकरणाला घडलेला ज्ञानानुभूतिजन्य साक्षात्कार होय अशी समर्थांची धारणा दिसते. ह्या प्रचीतीला समर्थांनी सर्वाधिक महत्त्व दिलें आहे. 'प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतिविण अवघे व्यर्थ ॥' असे ते म्हणतात.

ही प्रचीति घेण्याकरिता पुढीलप्रमाणे साधना आवश्यक आहे.

राजकारण करू इच्छिणाराने प्रथम सर्व परिस्थितीचे सम्यक् आकलन केले पाहिजे. त्याकरिता प्रवास अत्यंत आवश्यक आहे. प्रवासामुळे ठिकठिकाणची स्थिति समजते, निरनिराळे विचार ऐकायला मिळतात, लोकांच्या ओळखी होतात व त्यातून आपोआप परिस्थितीचे ताळज्ञान येते. उदा० समर्थ म्हणतात:–'कुग्रामें अथवा नगरें। पाहावीं घरांचीं घरें। भिक्षामिसें लहान थोरें। परीक्षून सोडावीं ॥१५-६-२४॥ सृष्टिमधे बहुलोक । परिभ्रमणें कळे कौतुक । नानाप्रकारीचे विवेक । आडळों लागती ॥ १९-८-१ ॥ सहजचि ताळज्ञान येतें। स्वभावेंचि रागज्ञान उमटतें। एकजचि कळत जातें। न्यायनीतिलक्षण ॥ १९-८-४ ॥' राजकारणाच्या साधकाने प्रथम देशस्थितीचे अवलोकन करावे, निरनिराळ्या लोकांचे विचार टिपून घ्यावे आणि ठिकठिकाणी मित्र निर्माण करावेत ह्या समर्थांच्या सूचना अत्यंत मार्मिक आहेत. तत्कालीन मराठी संतांपैकी एकटे रामदास राजकारणाकडे वळले याचे मूळ कारण त्यांनी देशभर प्रवास करून देशस्थिति पाहिली हे होय.

मानसिक परंतु प्रवास हे साधनेचे केवळ एक अंग आहे. ह्याच्या जोडीला दुसरी आवश्यक गोष्ट एकान्तात अध्ययन. 'अखंड येकांत सेवावा। ग्रंथमात्र धांडोळावा। प्रचित येईल तो घ्यावा। अर्थ मनीं ॥१८-३-२०॥' ग्रांथिक व प्रात्यक्षिक ज्ञान ह्या दोहोंनाहि समर्थांनी महत्व दिले आहे.

परंतु एवढयावरहि भागत नाही. देशस्थितीचा अनुभव, अनेकापासून ऐकलेले विचार आणि अध्ययनातून मिळालेले ज्ञान यांची सांगड घालण्याकरिता चिंतनाची अत्यंत आवश्यकता आहे. 'कोणाचा भर्वसा न धरावा। आपुला आपण विचार करावा। तकव उदंड धरावा। कोणी एक विषयीं ॥ १ ॥ एकांतीं चाळणा करावी। धारणा उदंड धरावी। नाना विचारणा करावी। अरिमित्रांची ॥३॥'

अशा रीतीने स्वतःच्या मनाशी काही निदान केल्यानंतर त्यावर इतरांचे अभिप्राय घ्यावेत; आणि बहुतेकांच्या अंतःकरणात आपल्या मनात येतात तसेच विचार जर येत असतील तर आपल्या विचारांची दिशा योग्य आहे असे समजावे. समर्थ म्हणतातः-'बहुतीं शोधून पाहिलें। बहुतांच्या मनास आलें। तरी मग जाणावें साधिलें। महत्कृत्य ॥ ११-१०-१६ ॥' किंवा 'जो बहुतांस मानला। तो जाणावा शाहाणा जाला ॥ १५-३-२६ ॥'

ह्याप्रमाणे सर्व बाजूंनी परीक्षा करून निदान ठरविल्यावर त्याचा प्रथम प्रयोग स्वतःवरच करावयाचा. 'आधी केले मग सांगितले' याला समर्थांच्या आचारपद्धतीत फार महत्वाचे स्थान आहे.

अशा रीतीच्या बहुविध साधनेने पुष्ट झालेले अंतःकरण शांत केले म्हणजे त्याला जी जाणीव होते किंवा जो साक्षात्कार होतो ती प्रचीति किंवा प्रत्यय होय. समर्थ म्हणतात 'असें असो राजकारण। सांगतां तें असाधारण। सुचित अस्तां अंतःकरण। राजकारण जाणे ॥' समर्थांनी सांगितलेला हा प्रचीतिवाद त्यांनी राज्यशास्त्राला दिलेली बहुमोल देणगी होय.

समर्थांची संघटन पद्धति

स्वतःची अशाप्रकारे तयारी झाल्यावर जनजागृतीकरिता संघटना कशी उभारावी याचे मार्मिक वर्णन समर्थांनी केले आहे. ते म्हणतात संघटना उभारणाराने परांतरांचा शोध घ्यावा व त्यातून नेतृत्व करू शकणारे चतुर लोक जवळ करावेत. अशारीतीने मुख्य मुख्य लोक जवळ केले म्हणजे त्यांच्या योगाने असंख्य सामान्य लोक जवळ येतात. ते म्हणतातः— 'याकारणें मुख्य मुख्यां। तयांसी करावें सख्य। येणे करितां असंख्य। बाजारी मिळती ॥ १५-१-२६॥' अशा तऱ्हेचे प्रमुख लोक जमवून त्यांना योग्य शिक्षण द्यावे व देशाच्या निरनिराळ्या भागात प्रचार-कार्याकरिता पाठवावे. समर्थ म्हणतात—'जाणते करून विखरावे। नाना देसीं ॥'

स्वतः समर्थांनी देशाच्या निरनिराळ्या भागांत हजार–दीड हजार मठांची स्थापना केली होती व तेथे महंत म्हणून नियुक्ति करून आपले शिष्य देशभर पसरविले होते. हे महंत म्हणजे लोकनेतेच होत. त्यामुळे त्याचे अंगी कोणते गुण असावेत व त्यांनी कसे वागावे हे सांगण्याकरिता समर्थांनी दासबोधातील समासच्या समास खर्ची घातले आहेत. दासबोध म्हणजे ह्या लोकनेत्यांना मार्गदर्शक अशी संघटन-संहिताच होय. महंत कसे असावेत ह्यावद्दलचे समर्थांचे वर्णन कोणत्याहि लोक-नेत्यास लागू होईल असेच आहे. कै. शं. श्री. देव यांनी महंताच्या गुणांची पुढील-प्रमाणे यादी केली आहे. १. परिभ्रमण. २. विवेक. ३. प्रयत्नवाद. ४. देहाच्या क्षण भंगुरतेची जाणीव. ५. कीर्तीची चाड. ६. वैराग्य. ७. निःस्पृहता. ८. मृदुवचन. ९. क्षमा, शांति, सहिष्णुता. १०. परोपकार व ११. उत्कटता. (सटीप श्री दासवोध, आवृत्ति ८ वी, प्रस्तावना) ह्या गुणांनी युक्त असलेल्या महंतांनी आणखी महंत करावेत; व अशा रीतीने देशभर सुसंघटित, ध्येयनिष्ठ, कुशल व त्यागी प्रचारकांचे जाळे निर्माण करावे.

लोकनेत्यांचे गुण व वास्तववाद

लोकसंघटना (समुदाये) व लोकजागृति (प्रवोध) करताना लोकनेत्यांनी (महंतांनी) कसे वागावे ह्याच्या मार्मिक, वास्तववादी व तपशीलवार सूचना समर्थांनी केल्या आहेत. प्रवोधशक्ति निर्माण करण्याकरिता अनेकांचे मनोगत हाती घेतले पाहिजे. (दासवोध १२-१०-३७) जीव जीवात मिसळून आणि आत्मा आत्म्यात घालून परहृदयाचा ठाव घेतला पाहिजे. (१५-१-४) मुलाच्या चालीने चालावे त्याप्रमाणे जनतेच्या पातळीवर येऊन लोकशिक्षण केले पाहिजे. (१३-१० २४) प्रत्येकाचा अधिकार पाहून त्याला काम सांगावे व जवळ किंवा दूर करावे. (११-१०-२१) दुर्जनांना पुरेपूर ओळखावे, पण त्याचा त्यांना मात्र थांगपत्ता लागू देऊ नये. (१९-९-२३) स्वतः नेहमी कष्ट करावेत; दुसऱ्यावर जो कायमचा विश्वास टाकतो त्याचा कार्यभाग वुडालाच म्हणून समजावे. (१९-९-१६) स्वतः नेहमी निःस्पृह असावे, तसेच बोलणे व चालणे यात एकरूपता असावी. (१२-९-२३) लोकांना आपला नेता जेथे तेथे हवासा वाटला पाहिजे परंतु नेत्याने मात्र कोणत्याहि प्रकारच्या आसक्तीत गुरफटून जाऊ नये. (१९-६-२१) भाषा नेहमी मधुर असावी, कारण जगात मित्र जमविण्याचे सूत्र जिव्हेपाशी आहे. कुणी उदंड धिक्कार केला तरी शांती चळू देऊ नये. (१२–१०–१६) धक्के–चपेटे सोसल्याने व नीच शब्द सहन केल्यानेच अखेरीस परकेहि आपले होतात. (१५–६–२२) नेत्याने नेहमी परोपकारी असावें. त्याने दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी व्हावे व दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद मानावा. (१२–१०–७) लोकांच्या अंतःकरणाला धक्का लागेल अशी वागणूक कधीहि करू नये; प्रत्येक ठिकाणी

अनुक्रमणिका

विवेकशील आचरण असावे. (१९-४-१९) जिथे जिथे उत्तम गुण असतील तेथून ते घ्यावेत व सर्व जनांस ते शिकवावेत; व त्यातून गुप्तपणे उदंड समुदाय किंवा संघटना निर्माण कराव्यात. (११-१०-१८) संघटित कार्यपद्धतीत नेत्याने मुख्य सूत्र आपल्या हाती ठेवावे व करावयाचे ते लोकांकरवी करून घ्यावे. (१९-९-१८) जुन्या लोकांकडून काम होत नाही असे दिसले तर नवीन लोक हाती धरले पाहिजेत. (१९-१०-१८) कार्य करतांना गुप्तता राखणेहिं अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता नेत्याने जावयाचे ते स्थळ सांगू नये व सांगितलेल्या स्थळी जाऊ नये. आपली स्थिति लोकांच्या अनुमानाला येऊ न देणे हा यांतला हेतू आहे. (११-१०-१०) याकरिताच सर्व योजना करीत असताना आपल्या हातच्या म्हणून काही गोष्टी नेत्याने अवश्य राखून ठेवाव्यात. सगळाच 'मगज' उघडा करू नये. (११-१०-२३) राजकारणी मनुष्याने वेष बावळा ठेवावा, पण अंगी नाना कळा असाव्यात. (१५-१-३१) नेत्याला लोकांची मने तयार करावयाची असतात व जे विघडले आहे ते घडवावयाचे असते. ह्याकरिता तेच ते संस्कार वारंवार करण्याचे फार महत्व आहे. यास्तव एकदा केलेले कर्म पुन्हा करावे, धरलेले ध्यान पुन्हा धरावे व निवेदिलेले विवरण पुन्हा निवेदावे. (११-६-१ व २) विरोधकांमध्ये जे 'बोलके पहिलवान' असतील त्यांच्याशीच प्रथम 'झटे' घ्यावेत. कारण त्यांचा पराभव झाला की बाकीच्यांशी 'झटे' घेण्याचे कामच पडत नाही. (१९-९-१३) जे अगदीच दुर्जन असतील त्यांचेशी प्रसंगच येऊ देऊ नये आणि प्रसंग चुकणार नसेल तर त्यांचा परस्पर निःपात करण्यास चुकू नये. (११-६-१७) त्याकरिता नष्टासी नष्ट व वाचाळासी वाचाळ योजावेत. (१९-९-११) गुप्तपणे काटीने काटी झाडण्यास काही हरकत नाही. (१९-९-८).

अशा आणखी कितीतरी सूचना समर्थांनी केल्या आहेत. ह्या सर्व लक्षात घेतल्या म्हणजे चातुर्ययुक्त, परिस्थितिसापेक्ष व शुद्ध वास्तववादी किंवा व्यवहारवादी राजकारणाचा समर्थांनी पुरस्कार केला आहे हे स्पष्ट होते.

राजकारण व नीति

तथापि ह्या राजकारणाला नीतीची चाड नाही असे मात्र नाही. दासबोधातील ज्या राजकारणनिरूपणनाम समासात समर्थांनी वरीलपैकी कित्येक सूचना केल्या आहेत त्यातच त्यांनी वारंवार 'नीतिन्यायासि अंतर। पडोंच नेदावें ।।११-६-६', 'परपीडेवरी नसावें। अंतःकरण ।। ११-६-१९ ।।,' 'येकांची पाठी राखणें। येकांस देखों न सकणें। ऐसीं नव्हेत कीं लक्षणें। चातुर्याचीं ।। ११-६-२५ ।।' असे उद्‌गार काढले आहेत. धर्मस्थापना हे राजकारणाचे अंतीम उच्च ध्येय होय. त्याकरिता त्यांनी सांगितलेली कार्यपद्धती चातुर्याची आहे, अनीतीची नाही. महंत लक्षणनाम

समासात समर्थांची दृष्टि अगदी स्पष्ट झाली आहे. ते म्हणतात–'राखो जाणें नीति न्याये। न करी न करवी अन्याये। कठिण प्रसंगी उपाये। करूं जाणे ॥११-६-१८॥' राजकारणी नेत्यांनी वागावयाचे ते नीती न्यायानेच. परंतु अपवादादाखल कठिणच प्रसंग आला तर विशाल नैतिक ध्येयावर दृष्टि ठेऊन आलेल्या प्रसंगाला वास्तववादी दृष्टीने तोंड देण्यात समर्थांना संकोच वाटत नाही. कारण, 'समयासारिखा समयो येना। नेम सहसा चालेना। नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ १८–७–६ ॥' हे त्याचे यथार्थ मत आहे. नीति–अनीति ह्या कल्पना परिस्थितिसापेक्ष आहेत. 'प्रसंग पाहिल्याविण। सकळ खोटें॥ १२–३–२९॥' असे समर्थ म्हणतात.

समर्थांच्या राजकारणाची लक्षणे

वास्तववाद हे समर्थांच्या राजकारणाचे प्रमुख लक्षण आहे. चातुर्य हे दुसरे लक्षण आहे. ह्याशिवाय समर्थांच्या राजकारणाची आणखी चार लक्षणे आहेत. यांतील एक लक्षण विवेकवाद. योग्य निर्णय विवेकाद्वारेच घेतला जातो. व विवेकाला आकलन होत नाही असे काहीच नाही एवढी मोठी भिस्त समर्थांना विवेकाची वाटते. ते म्हणतात–' विवेकामध्यें सांपडेना। ऐसे तों कांहीच असेना। येकांतीं विवेक अनुमाना। आणून सोडी ॥ १९–६–२८॥' विवेकामुळेच 'समर्थ' ही पदवी मिळते (१८–१०–५६) इतकेच नव्हे तर विशेष विवेकी लोकच अवतारी पुरुष मानले जातात. (१५–३–५).

विवेकवादाइतकेच प्रयत्नवाद हेहि समर्थांच्या राजकारणाचे वैशिष्टय आहे. सर्व प्रकारच्या रेषा–प्रारब्धरेषा देखील–प्रयत्नाने पुसल्या जाऊ शकतात असे ते म्हणतात. (१५–६–९) हरिकथा, राजकारण व सावधपण यानंतर 'चौथा अत्यंत साक्षेप' म्हणून उद्योगाला समर्थांनी महत्व दिले आहे. प्रयत्नवादातूनच त्यांचा दुर्दम्य आशावाद निर्माण झाला आहे, व 'वन्हि तो चेतवावा रे। चेतवितांचि चेततो। केल्याने होत आहे रे। आधी केलेंचि पाहिजे ॥' असा चैतन्यमय संदेश त्यांनी दिला आहे.

सामर्थ्यवाद हा तर समर्थांच्या राजकारणाचा पाया आहे. विशेषत: राजकीय आपत्कालात सामर्थ्याशिवाय काहीहि करता येत नाही. 'धकाधकीचा मामला। कैसा घडे अशक्ताला॥ (१९–१०–२२) असे समर्थ विचारतात. सामर्थ्याशिवाय सत्ता गाजवू पहाणाराला समर्थांनी मूर्खात काढले आहे. (२–१–११). राजकारणात जशास तसे हाच न्याय लागू पडतो, म्हणून 'धटासी आणावा धट। उद्धटासी पाहिजे उद्धट। खटनटासी खटनट। अगत्य करी ॥ १९–९–३०॥' समर्थ म्हणतात–'शक्त तो सर्वही भोगी। शक्तीवीण दरिद्रता ॥ १८॥ शक्तीने मिळती राज्यें। युक्तीने यत्न होतसे। शक्ति युक्ति जये ठाईं। तेथे श्रीमंत धावती ॥ १९॥...युक्तीला पाहिजे शक्ति। तस्मात् शक्ति प्रमाण हे ॥ २५॥'

ह्याकरिताच समर्थांनी ठिकठिकाणी मारुतीची स्थापना करून शक्तीची उपासना सुरू केली.

जनता–जनार्दनवाद हेहि समर्थांच्या राजकारणाचे महत्वाचे वैशिष्टच आहे. जनसेवा हीच जनार्दनसेवा आहे ह्या भावनेने समर्थ राजकारणाकडे पाहतात. 'पृथ्वीमध्ये जितुकी शरीरें। तितुकी भगवंताची घरें' म्हणून 'नारायण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी। या कारणें तोषवावी। कोणीतरी काया ॥ १५–९–२५ ॥' अशा रीतीने संतपणाची व राजकारणाची सुंदर सांगड समर्थांनी घातली आहे. अतएव 'लोक राजी राखोन कीजे। सकळ कांही ॥ १९–७–७ ॥' असा लोकशाही उपदेश त्यांनी केला आहे. मात्र यातहि 'जनीं जनार्दन असे। परी तो सज्जनीं वसे ॥' हा विवेकहि त्यांनी केला आहे.

रामदासी संप्रदाय किंवा 'राघवाचा पंथ'

आतापर्यंत समर्थांच्या राजकीय तत्वज्ञानाचे वर्णन केले आहे. परंतु समर्थांचे आध्यात्मिक तत्वज्ञानहि अत्यंत मोलाचे आहे. ही दोन्ही तत्वज्ञाने एकत्र सांधून त्यांनी ती आपल्या शिष्यांच्या जीवनात उतरविण्याचा प्रयत्न केला. यातूनच

सूर्य उगवला तरी–

रात्र आंधळी बसली
पीठ व्यथेचे दळीत
सुकलेल्या आठवणी
आसवांनी भिजवित !

सारा भूतकाळ उभा
पुढे, आंधळ्या डोळ्यात
कुठे आकाशात होता
शुक्रतारा पहाटत !

आठवणींचे दळण
कसे सरता..सरेना...
सूर्य उगवला तरी—
प्राची आज उजळेना !

–कृष्णा चौधरी

अनुक्रमणिका

त्यांच्या रामदासी संप्रदायाचा किंवा 'राघवाच्या पंथा'चा जन्म झाला. आज जरी हा पंथ प्रामुख्याने आध्यात्मिक स्वरूपाचा असला तरी रामदासांच्या काळी त्याचे आध्यात्मिक व राजकीय असे द्विविध स्वरूप होते ही गोष्ट निर्विवाद आहे. स्वतः समर्थांनी ह्या संप्रदायाची पुढील वीस लक्षणे सांगितली आहेत त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

प्रथम लिहिणे, दुसरे वाचणे । तिसरे सांगणे अर्थांतर ॥१॥
आशंका निवृत्ति ऐसी चौथी स्थिति । पाचवी प्रचीती अनुभवे ॥२॥
साहवे ते गाणे, सातवे नाचणे । ताळी वाजवणे आठवे ते ॥३॥
नववा अर्थभेद, दहावा प्रबंध । अकरावा प्रबोध प्रचीतीसी ॥४॥
बारावे वैराग्य, तेरावा विवेक । चौदावा तो लोक राजी राखे ॥५॥
पंधरावे लक्षण ते राजकारण । सोळावे ते जाण अव्यग्रता ॥६॥
प्रसंग जाणावा हा गुण सत्राचा । काळ समजावा सर्वा ठाई ॥७॥
अठरावे लक्षण वृत्ति उदासीन । लोलंगता जाण तेथे नाही ॥८॥
एकोणविसावे चिन्ह सर्वासी समान । राखे समाधान ज्याचे त्याचे ॥९॥
विसावे लक्षण राम उपासना । वेध लावी जना भक्तिरंगे ॥१०॥

(स्फुट ओव्या)

कै. ल. रा. पांगारकर यांनी २१. आचार २२. न्यायनीति राखणे, २३. नित्य भीक्षामिषाने फिरणे, २४. सावधपण व २५ साक्षेप अशी अधिक लक्षणे सांगितली आहेत. (समर्थ संजीवनी, संपादक–ल. रा. पांगारकर, प्रकरणांचा सारांश पृ. ३३) ही यादी आणखीहि वाढविता येईल व आतापर्यंत सांगितलेली सर्व तत्वे त्यात समाविष्ट करता येतील. तसेच समर्थ संप्रदायाची लक्षणे सूत्ररुपाने व महत्वनिदर्शक क्रमाने पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. पारमार्थिक कल्याणासाठी हरिकथानिरूपण.
२. ऐहिक कल्याणासाठी राजकारण.
३. सर्व बाबतीत सावधपण; आणि
४. सर्वासाठी अत्यंत सापेक्ष (म्ह. निरलस प्रयत्न).

"मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे तें राजकारण ॥
तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ॥२॥

चौथा अत्यंत साक्षेप ।" यात समर्थांची संपूर्ण जीवनदृष्टि व्यक्त झाली आहे असे म्हणता येईल.

(समाप्त)

★ ★ ★

अनुक्रमणिका

कल्पना वेड

पाचोळयांनी केला
वाऱ्याचा पाठलाग
पाण्यामागे धावली
विझलेली आग   १

अंधाराचे स्वप्न
पाहिले प्रकाशाने
अर्थ त्यातला चोरला
गुपचुप रात्रीने   २

क्षितिजाच्या पायांनी
चालले आकाश
आकाश–हातांचा
क्षितिजास पाश   ३

माझ्या कल्पनेचं
कधी मधी वेडं
शब्दामागे शब्दातून
धावते दुडदुड   ४

पारिजातकाने रंग
घेतला अबोलीचा
अबोलीला गन्ध
आता पारिजातकाचा   ५

कल्पनेला वेडा नाद
वेड गुंफावे शब्दांत
मीहि वेडा सुंगतो
अबोलीत परिजात   ६

—अनिल दहिवाडकर

अनामिकाची चिंतनिका

एक वैचारिक आत्मकथा] [भाग ३ रा

१

शरीर अंथरुणाला खिळलेले, बद्ध आणि गतिशून्य, आणि मन स्वैर संचारी.–

जीवनरथाचे एक चाक भुईत रुतून बसलेले आणि दुसरे अवांतरी आपल्याच भोवती गरगर फिरत असलेले.–

लाकूड, लोखंड अथवा कुठल्याहि जड वस्तूचे चाक, कोणी धक्का देता, आपल्याच भोवती फिरते. परंतु माणसाचे मन स्वयंभू गतिशील असते. ते जसे आपल्याच भोवती फिरू शकते तसेच अन्यत्र, दिक्कालाच्या सीमा उल्लंघून, कुठेहि संचार करू शकते.–

माणसाच्या मनाला काही मर्यादा असतील का ?–

मला वाटते, असाव्यात. अनेक प्रतिभाशाली कलावंताची, लेखकांची, तत्वज्ञांची प्रातिभ-निर्मिति माझ्या मनाच्या व सृजनशक्तीच्या आवाक्याबाहेर आहे, हे मला जाणवते. म्हणून माझ्या मनाला मर्यादा असल्याच पाहिजेत, असे मला वाटते. माझे मन वाटेल ते करू शकत नाही हे, माझ्यापुरते तरी, स्पष्टच आहे.

पण इतरांच्या मनांना जे करता येते ते मला करता येत नसले, आणि म्हणून या बाजूच्या मर्यादा मला जाणवत असल्या, तरी अशी एखादी दिशा असलीच पाहिजे की, जिकडे माझे मन अमर्यादपणे जाऊ शकेल. निदान एखाद्या दिशेकडे तरी माझे मन अमर्यादपणे संचार करण्यास समर्थ असले पाहिजे, असे मला वारंवार वाटत आले आहे-

प्रत्येक व्यक्तिमनाला, अशी एक तरी दिशा असलीच पाहिजे की, जिला सीमा नाही. ही दिशा कोणती हे जर प्रत्येक व्यक्तीला स्पष्टपणे जाणवले व त्याच

● लेखक:– पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ●

अनुक्रमणिका

दिशेने अखंड जात राहण्याचा निश्चय ती निश्चल ठेवू शकली, तर प्रत्येक माणसाला आपल्या उन्नतीचा मार्ग कदाचित् स्पष्टपणे दिसल्यावाचून राहणार नाही.–

मला वाटते, मी याच दिशेच्या शोधात आहे. –केवळ एकाच दिशेने गेल्यास अनंताचे भांडार खुले होण्याचा संभव असणे, आणि ही दिशा कोणती हे न जाणवल्यामुळे, भांबावल्याप्रमाणे, भ्रमिष्टासारखे इतस्ततः सैरावैरा धावपळ करीत असता मर्यादांच्या वज्रकठोर परकोटावर आदळून वारंवार छिन्नभिन्न आणि रक्तबंबाळ होत राहणे, हे दोनच पर्याय मानवांना निसर्गाने, नियतीने अथवा परमेश्वराने दिले असावेत.–

माझ्याप्रमाणेच असंख्य मावनांना, आपल्या मनाची अनंताशी भिडलेली दिशा कोणती, हे न कळल्यामुळे, तेहि भ्रमिष्टासारखे इतस्ततः सैरावैरा धावत आहेत आणि वज्रकठोर मर्यादाच्या भिताडांवर वारंवार आदळत आहेत, छिन्नभिन्न व रक्तबंबाळ होत आहेत.

–'**दिशाभूल**' हेच मानवी संसारातील सर्व दुःखांचे, सर्व अपयशांचे, सर्व विध्वंसक संघर्षांचे मूळ असले पाहिजे.–

–अनेक आध्यात्मिक पंथात, साधकाला 'दीक्षा' देण्याचा जो एक प्रघात आहे तो त्याच्या मनाला अनंताकडे नेणारी 'दिशा' दाखविण्याकरिताच तर नसेल ना ?–

२

ज्या व्याधीने मला या अंथरुणाला खिळून ठेवले आहे ती मोठी विचित्र आहे. डॉक्टर व शारीरतज्ज्ञ म्हणतात की, माझ्या मेरुदंडाचा (पाठीच्या कण्याचा) अगदी खालचा मणका, माकडहाडाशेजारचा, दूषित झाला आहे. कुठल्याहि औषधोपचारांनी तो बरा होण्याचा संभव नाही. कोटिकोटि माणसांत शेकडो वर्षांत एखाद्यालाच ही व्याधि जडते. आणि आधुनिक तज्ज्ञांच्या मते, प्लॅस्टरमध्ये घालून सारी पाठ माकड हाडापर्यंत घट्ट आवळून टाकणे आणि रोग्याला अंथरुणावर अनेक महिने विश्रांति घेण्यास भाग पाडणे, एवढाच एक उपाय या विचित्र व्याधीवर संभवतो.–

आणि म्हणून मी हा असा अंथरुणाला खिळून पडलो आहे– दुर्बल, असहाय हताश, हतबुद्ध–

पाठीचा कणा.– उत्क्रांतिवाद सांगतो की, प्राण्यांचा पाठीचा कणा जसजसा पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण–शक्तीला विरोधून, व पृथ्वीच्या सपाटीला काटकोन करून वर वर जाऊ लागला, तसतसा प्राणी उन्नत व अधिकाधिक प्रगतिशील होऊं

लागला. ताठ, मजबूत व निरोगी अशा मेरुदंडाचे अधिष्ठान लाभले म्हणूनच मानव पृथ्वी पादाक्रांत करू शकला. मानवाच्या या विस्मयजनक कर्तृत्वशक्तीचे केंद्र त्याच्या पाठीच्या कण्यातच साठलेले आहे.

—आणि नियतीने मला नामोहरम करण्यासाठी नेमका माझ्या पाठीच्या कण्यावरच आघात केला !

—आधुनिक शारीरशास्त्राला व प्राणिशास्त्राला जे अलीकडेच कळले, ते हजारो वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांना कळून चुकले होते. योगशास्त्रात पाठीच्या कण्याला व या कण्यातील मणक्यांना अपरंपार महत्व देण्यात आले आहे. किंबहुना ज्या वैश्विक शक्तीने मानव आकारास आणला त्या वैश्विक शक्तीचे मानवी शरीरातील केंद्रस्थान म्हणजे मेरुदंड अथवा पाठीचा कणा. या कण्याच्या अगदी तळाशी असलेल्या मणक्याच्या शेजारी, जननेंद्रियाच्या खाली, एक मूलाधारचक्र आहे, असे योगशास्त्र व त्यावर आधारलेले मंत्रतंत्र ग्रंथ सांगतात. या मूलाधार-चक्रात भुजंगिनी नावाची 'कुंडलिनी शक्ति' सापासारखे वेटोळे करून सुप्त स्थितीत पहुडलेली आहे. वैश्विक शक्तीचे मानवी शरीरातील केंद्र, म्हणजे हे मूलाधारचक्र आणि त्यात सुप्तावस्थेत असलेली कुंडलिनी देवता. ही कुंडलिनी शक्ति जागृत करण्याची प्रक्रिया यौगिक व मंत्रतंत्र ग्रंथांत तपशीलवारपणे सांगित-लेली आहे. आणि ती जागृत झाल्यास जे तेजस्वी चमत्कार घडून येतात, ज्या विस्मयजनक 'सिद्धी' माणसाला प्राप्त होतात, त्यांचेहि मनाला स्तंभित करून टाकणारे वर्णन या ग्रंथांत केलेले आहे. कुंडलिनी जागृत करून पाठीच्या कण्याच्या तळापासून तिला वर वर न्यावयाचे, मध्यंतरीच्या सहा चक्रांचा भेद करावयाचा आणि सरतेशेवटी मस्तकाच्या कवटीला लागून असलेल्या सहस्त्रारचक्राला प्रस्फुरित करावयाचे. हे ज्याला साध्य होते तो सृष्टीच्या कर्त्याधर्त्या परमेश्वरा-इतका शक्तिशाली होतो, तो परमेश्वरच होतो, असे हे शास्त्र सांगते.—

—अंथरुणाला खिळून ठेवणाऱ्या या लोकविलक्षण व्याधीने माझे मन योगशास्त्राकडे जोराने खेचून नेले असल्यास नवल काय ?— या शास्त्राचे बरेच वाचन मनन अलीकडे मी केले. पण सरतेशेवटी 'मूले कुठारः' अशीच माझी गत झाली. मूलाधारचक्राला लागून असलेला पाठीच्या कण्याचा मणकाच जिथे दूषित तिथे मूलाधार चक्रातील कुंडलिनीला जागृत करून मस्तकापर्यंत वर नेण्याची गोष्टच बोलायची सोय नाही.—

—नियतीने माझा चांगलाच सूड घेतला आहे !—

● ● ●

योगात आणि योगाधिष्ठित तंत्रमंत्र ग्रंथांत मानवी मनाचा फारच सूक्ष्म

अनुक्रमणिका

अभ्यास केलेला आढळतो. योगशास्त्र म्हणजे आत्यंतिक विस्मयाचे एक अलौकिक भांडार आहे. 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' या म्हणीचा केवळ यथार्थ प्रत्ययच नव्हे, तर मानवाला विश्वव्यापी ब्रह्माचा साक्षात्कार घडवून तदाकार करण्याची प्रायोगिक प्रक्रिया या ग्रंथांत तपशीलवारपणे सांगितली आहे.

या ग्रंथांचा दावा खरा की खोटा, ही प्रत्यक्ष प्रयोगाने व अनुभवाने व पडताळून पाहण्याची गोष्ट आहे. पण हा प्रयोग इतका खडतर व संकटग्रस्त आहे की, सामान्य माणसांनी त्यापासून दूर राहणेच शहाणपणाचे ठरेल. या ग्रंथांतील दाव्यावर विश्वास ठेवण्याला देखील असामान्य बौद्धिक व मानसिक साहसाची आवश्यकता आहे.–

एकदा, तारुण्याच्या ऐन उमेदीत, योगाच्या खोल भुयारात शिरण्याचा बराच उत्कट प्रयत्न मी केला होता. त्यात मला काय गवसले हे सांगता येणे फार कठीण आहे. काही गवसले असे जसे म्हणता येत नाही, तसेच काहीच गवसले नाही, असेहि म्हणता येत नाही. एवढेच म्हणता येईल की, ते एक निराळेच विश्व आहे. प्राथमिक प्रगतीच्या जरा पुढे जाऊ लागताच एका अनंत व अंधाऱ्या पोकळीत आपण प्रवेश करीत आहोत, असे वाटू लागते. अनंत काळोख आणि अनंत पोकळी– आणि तरीपण अभावरूप शांति आणि समाधान.–धीर न सोडता तसाच पुढे पुढे गेलो असतो तर अभावातहि भाव भरला गेला असता व मला कदाचित् प्रकाश दिसलाहि असता. पण निसर्गाला '-अभावरूप पोकळी' सहन होत नाही म्हणतात, तसाच काहीसा प्रकार माझ्या बाबतीत झाला असावा. ती अनंत व अंधारी पोकळी अनपेक्षितपणे व विस्मयजनक रीतीने पुरेपूर भरून निघाली. आणि मी पुरेपूर संसारी माणूस बनलो !

● ● ●

संसारी जीवनावर माझे अपरंपार प्रेम आहे. संसारी जीवन, गृहस्थी जीवन हेच सर्व प्रकारच्या मानवी कर्तृत्वाचे खरे क्षेत्र आहे. आध्यात्मिक कर्तृत्वाचे देखील हेच खरे क्षेत्र आहे. आध्यात्मिक विकासाची खरी कसोटी संसारी जीवनातच लागू शकते. संसारापासून दूर पळून जाणे आणि 'अहं ब्रह्मास्मि'–ची भाषा बोलू लागणे, हा वदतो व्याघाताचाच एक प्रकार आहे, असे मला वाटते.–

'**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः**' हे गीतेतील वाक्य केवळ महाभारतातील कौरव–पांडव युद्धालाच लागू होणारे नव्हे. ते अखिल मानवी संसाराला व केवळ संसारी जीवनाला लागू पडणारे वाक्य आहे. संसारी जीवन हेच खरे 'धर्मक्षेत्र' व 'कुरुक्षेत्र' होय. याच रणांगणावर सर्व प्रकारच्या मानवी कर्तृत्वाची अखेरची व निर्णायक परीक्षा होत असते. योग्यांनी हिमालयाच्या गिरीकुहरी

खुशाल जाऊन बसावे आणि काय साधना करावयाची असेल ती करावी. परंतु साधना संपल्यावर आपल्या सिद्धावस्थेची कसोटी लावण्यासाठी संसाराच्या धर्म-क्षेत्रावर व युद्धक्षेत्रावरच त्यांनी दंड थोपटून उभे राहिले पाहिजे. मानवी जीवनाचा अखेरचा मानदंड म्हणजे सर्वसामान्यांचा नित्याचा संसार. या मान-दंडावर आपल्या कर्तृत्वाची कसोटी लावण्यास जे कचरतात त्यांच्या 'सिद्धि' कितीहि मोठ्या व विस्मयजनक असल्या तरी त्या मानवी जीवनाच्या दृष्टीने अर्थशून्यच मानल्या पाहिजेत.—

मला ही विशिष्ट जीवननिष्ठा प्राप्त होण्यास कोणकोणत्या घटना व कोणकोणते अनुभव कारणीभूत झाले असतील, हे सांगणे कठीण आहे. एवढे मात्र खरे की, माझ्या या आताच्या आत्यंतिक असहाय, दुर्बल, हताश व हतबुद्ध अवस्थेतहि या जीवननिष्ठेची धुगधुगी अद्याप कायम आहे. किंबहुना या जीवन-निष्ठेची ज्योत अंतःकरणात अद्याप तेवत आहे म्हणूनच या असहाय अवस्थेमुळे मी इतका अस्वस्थ झालो आहे. विचारांचे फवारे उडविण्यापलीकडे आपल्याला आता दुसरे काहीच करता येऊ नये, हीच माझी खरी व्यथा आहे. या व्यथेची वेदना हीच माझ्या सांप्रतच्या सर्व विचारांची जननी बनली आहे.

३

संसारी जीवनावर माझे अपार प्रेम आहे, असे मी म्हणतो; पण या प्रेमाचीहि परिणति मला सांप्रतच्या या असहाय, हताश व करुणाजनक अवस्थेप्रत आणून टाकण्यात व्हावी, ही घटना मला असह्य होत आहे. मानवाच्या आशा, इच्छा, आकांक्षा कितीहि उच्च व उदात्त असल्या, त्यांचे जीवन कोणत्याहि विशुद्ध व विशाल ध्येयाने प्रेरित झालेले असले, तरी एक काळ असा येतोच येतो की, जेव्हा त्याला सर्व, सर्व काही, व्यर्थ, व्यर्थ वाटू लागते. मानवी कर्तृत्वाची क्षुद्रता आणि मानवी जीवनाची व्यर्थता मनाला एकदा बोचू लागली व हृदयाला पोखरू लागली की, मानवी अहंतेच्या ती पार चिंधड्या उडवून टाकते.—

माझे जीवन—

अखंड विकास पावणाऱ्या नवनव्या आशा—इच्छा—आकांक्षांनी सदा रंगलेले, कधी अतीव दुःखाने अश्रुमय होणारे तर कधी अतीव आनंदाने प्रफुल्लित होणारे, आणि अश्रु व हास्य या दोन पंखांच्या साहाय्याने आकाशात अनिर्बंधपणे भराऱ्या मारणारे माझे जीवन, आता हे असे निष्क्रिय, निस्तेज, निष्प्रयोजन होऊन येथे पडलेले आहे.—

करता येण्यासारखे माझ्यापाशी आता कांहीहि उरलेले नाही. बोलता येण्या-

अनुक्रमणिका

सारखे मात्र थोडे काही बाकी उरलेले आहे. पण बोलण्याकरता ऐकणारा कोणी तरी असावा लागतो. सारे लोक आपापल्या कामात अथवा नादात दंग असता माझे बोलणे ऐकणार कोण? आणि ऐकायला कोणी तयारहि झाले तरी कोणाशीहि मला वाटेल ते बोलता येणे दुरापास्तच आहे. आणि खरे सांगायचे म्हणजे बोलण्यासाठी देखील शरीराच्या काही अवयवांची, विशेषतः हातवाऱ्यांची व अंगविक्षेपांची आवश्यकता असते, हे आता मला चांगलेच जाणवले आहे. हातवारे व अंगविक्षेप या अजब व्याधीमुळे अवखळले गेल्यामुळे माझी वाचाहि आपोआपच बंद पडू लागली आहे. आणि म्हणूनच की काय, या पांढऱ्या कागदावर काळे करण्यात काळ कंठणे माझ्या कपाळी आले आहे. एका अर्थाने, केवळ बोलता येण्यासारखेच जे काही माझ्यापाशी बाकी उरले आहे, असे मला वाटते, ते बोलून टाकण्यासाठी मी मलाच माझा श्रोता बनवून टाकले आहे! माझे हे लेखन म्हणजे आपल्याशीच आपण बोलत बसण्यासारखेच नाही का?–

● ● ●

आधुनिक शारीर व मानसशास्त्रज्ञ सांगतात की, माणूस आपल्याशीच बोलण्यात गर्क राहू लागला की, समजावे की, तो वेड लागण्याच्या वाटेवर आहे. माझे हे बोलणे कोणी वेडचाचे बेताल बरळणेच ठरविले तर त्याला मी काय उत्तर देऊ शकणार?

तेच आधुनिक शारीर–मानसशास्त्रज्ञ असेहि सांगतात की, समतोल समंजसपणा (Normality) आणि वेड (Insanity) यांच्यात फारच थोडे अंतर असते. इतके की, एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत मनुष्य कसा व केव्हा जाईल, याचा काहीच नेम नसतो. आणि म्हणून कित्येक वेळा, एखादा माणूस वेडा की समंजस, हे निश्चयाने सांगणे, तज्ज्ञांनादेखील कठीण होऊन बसते!–

माझ्या या सांप्रतच्या, शारीरदृष्टचा शवासनस्थ अवस्थेतून मी जेव्हा बाह्य जगाकडे व मानवी जीवनाकडे पाहू लागतो तेव्हा मला कित्येकदा असा गंभीर प्रश्न पडतो की, आधुनिकतेने प्रभावित झालेले हे आजकालचे मानवी जग समंजस मानावे की, भयानक व दुराराध्य वेडाने झपाटलेले मानावे?

माझ्याकडे, माझ्या उशापासच्या मेजावर रोज चारपाच दैनिके पडलेली असतात. हैड्रोजन बाँबच्या प्रायोगिक प्रात्यक्षिकांनी सर्व जगाला बसलेला हादरा व त्यामुळे अनेक विचारवंतांच्या मनात उफाळलेला प्रक्षोभ, यांची भडक वर्णने वृत्तपत्रांत आताशा रोज प्रकाशित होत आहेत.

इवलासा परमाणु!–डोळयांना देखील न दिसणारा. पण त्याचा भेद करण्याची प्रक्रिया अवगत होताच प्रचंड विध्वंसक शक्ति त्यातून निर्माण झाली. परमाणु–

स्फोटक, हायड्रोजन स्फोटक आणि आता कोबल्ट–हायड्रोजन स्फोटक, अशी एकापेक्षा एक वरचढ व विध्वंसक स्फोटके कोटचवधि रुपयांचा खर्च करून आता तयार होऊ लागली आहेत. समग्र पृथ्वी भस्मसात करून टाकण्याइतकी विध्वंसक शक्ति अमेरिकेत केंद्रित झाली आहे, असे ही वृत्तपत्रे रोज आक्रोशून व आक्रंदून सांगत आहेत.

आधुनिक यंत्र–तंत्र–शास्त्राने समग्र मानवी जीवन प्रचंड रीतीने प्रभावित करून आपल्या मुठीत आवळून धरले आहे. ही प्रचंड शक्ति दोन युद्धपिपासु तटांत विभागली गेली आहे. आणि समग्र जगावर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या महत्वाकांक्षेने हे दोन्ही तट आपापली विध्वंसक शक्ति यंत्र–तंत्र शास्त्रांच्या साहाय्याने अधिकाधिक उग्र करण्याची शिकस्त करीत आहेत.

जगात शांतता प्रस्थापित करण्याचे सर्व प्रयत्न विफल ठरत आहेत. आणि त्यामुळे अखिल मानवजात वैफल्याच्या भावनेने विकल झालेली आहे. सुख, समाधान, शांति, प्रगति, आणि सुजनतेचा विकास करू शकणारी सारी जीवनमूल्ये, सारे मानव भयानक संकटात सापडल्यामुळे, प्रश्नचिन्हांकित झाली आहेत.–

एकीकडे भौतिक–शास्त्रांची 'प्रगति' परमावधीला पोचली आहे, तर दुसरीकडे समग्र मानवी जीवन अभूतपूर्व अशा संकटात सापडले आहे. एका टोकाला प्रगतीची परमावधि, तर दुसऱ्या टोकाला सर्वस्व–विनाश – अशा समग्र जीवनव्यापी द्वंद्वाने मानवी जगाला घेरून टाकले आहे.–

सत्ता, संपत्ति, शास्त्र व विध्वंसक शस्त्रास्त्रे यांच्या केंद्रीकरणामुळेच हे भयानक द्वंद्व मानवासमोर उभे राहिले आहे, असे एक मत आहे. या मताचे विचारवंत विकेंद्रीकरणाचा उपाय जगापुढे मांडत आहेत. पण परमाणु–स्फोटक व त्यासाठी आवश्यक असलेले विशेष ज्ञान यांचे विकेंद्रीकरण शक्यतेच्या पलीकडचे आहे. प्रचंड अशी केंद्रीभूत शक्ति निर्माण करणारे विशेष ज्ञान केवळ अज्ञानाने काबूत आणता येणे शक्य नाही. एका प्रकारच्या विशेष ज्ञानावर मात करण्यासाठी दुसऱ्या, अधिक प्रभावी अशा विशेष ज्ञानाची आवश्यकता असते. हे असे दुसऱ्या प्रकारचे अधिक शक्तिशाली असे विशेष ज्ञान जोवर आकारास येत नाही आणि जोवर हे नवे विशेष ज्ञान 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्' या गीतावाणीवर अचल श्रद्धा ठेवणाऱ्या नेत्यांच्या नियंत्रणाखाली येत नाही, तोवर आधुनिक जगासमोर 'आ' वासून उभे असलेल्या विराट् व भयानक द्वंद्वापासून मानवाची मुक्तता होणे संभवनीय दिसत नाही.

● ● ●

अनुक्रमणिका

आधुनिक जगाचा मीहि एक लहानसा प्रतिनिधी आहे—नेत्यांचा नसलो तरी सामान्यांचा मी एक प्रतिनिधी खासच आहे. आधुनिक जगाने निर्माण केलेल्या अनेक संघर्षांची झळ मला लागलेली आहे; केवळ संघर्षमय जन—आंदोलनांचीच नव्हे, तर संघर्षमय वैचारिकांची देखील. या संघर्षमय जीवन—संग्रामात, या अथवा त्या बाजूने लढून अनेकदा जखमी झालेला मी एक सामान्य सैनिक आहे. आणि आज भीष्मासारखा शरपंजरी जो मी पडलो आहे त्याचे निदान एक कारण तरी या जीवनव्यापी महायज्ञात मी यथाशक्ति टाकलेली आहुति, हे आहे

सारे काही आता 'अग्नये स्वाहा' होत आहे. मानवताव्यापी महायज्ञ सांप्रत जगात सुरू झाला आहे. या महायज्ञाचे 'होते' वैश्विक आत्मशक्तीची अवहेलना करणारे आहेत. आणि म्हणून हा महायज्ञ असंख्यांचे निर्दयपणे बळी घेत आहे. या महायज्ञाचे मंत्र—तंत्र उलटे आहेत, उरफाटे आहेत, वैदिक यज्ञप्रक्रियेच्या विरुद्ध दिशेला जाणारे आहेत. आणि म्हणून पशुबलींच्या ऐवजी नरबलींच्या आहुति लाखांच्या संख्येने या यज्ञात जबरीने फेकल्या जात आहेत.

या मानवी महायज्ञाचे होतृत्व हाती घेण्यासाठी वेदप्रणीत सारी यौगिक मंत्र—तंत्र शक्ति पुन्हा एकवार जागृत करण्याची आता वेळ आली आहे.—

या असहाय, हतबल अवस्थेतदेखील आशेचा किरण जर मला कुठे दिसत असेल तर तो वेदांताच्या, योगाच्या वैदिक मंत्र—तंत्र विद्येच्या सामर्थ्यशाली व प्रतिभाशाली पुनरुत्थानात. मला असे का वाटू लागले आहे, याचाच मी सध्या शोध घेत आहे.— (क्रमशः)

★ ★ ★

अभिप्राय

श्री. स. वा. कोगेकर प्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज पुणे, यांनी दि. ६—११—६० रोजी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. त्यावेळी वि. सा. संघाचे कार्याबद्दल त्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय—

विदर्भ साहित्य संघाची इमारत, रंगमंदिर वगैरे पाहिले. कार्याची माहिती करून घेतली. साहित्य, नाट्य कला, इतिहास—संशोधन या क्षेत्रात अत्यंत मौलिक कार्य चालू असलेले पाहून अत्यंत समाधान वाटले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात या संस्थेचे स्थान निःसंशय स्पृहणीय आहे. श्री. शेंडे, प्रा. कोलते, प्रा. काशीकर वगैरे विद्वानांच्या भेटीचा योग आला हीहि भाग्याची गोष्ट वाटते. संस्थेस उत्तरोत्तर अधिकाधिक यश लाभो.

६-११-१९६० स. वा. कोगेकर

अनुक्रमणिका



★

पन्नास कादंबऱ्या लिहून विक्रम करणारे यशस्वी लेखक

प्रा. ना. सीं. फडके

★

महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक, नामवंत टीकाकार आणि यशस्वी कादंबरीकार **प्रा. नारायण सीताराम फडके** यांचा आक्टोबर महिन्यात मुंबई येथे पन्नास कादंबऱ्या लिहून विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्रराज्याचे मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अनेक व्यक्तींनी आणि संस्थांनी प्रा. फडके यांचा सत्कार केला. तसेच लोकसत्ताकार श्री. ह. रा. महाजनी, प्रा. अनंत काणेकर, डॉ. मा. गो. देशमुख आणि प्रा. फाटक यांची गुणवर्णनपर भाषणे झाली. प्रा. फडके यांची पहिली कादंबरी "अल्ला हो अकबर" ही १९२१ साली प्रसिद्ध झाली. आणि त्यांची पन्नासावी कादंबरी "कुहू! कुहू!!" ही आक्टोबरच्या १९६० मधे प्रसिद्ध झाली.

विदर्भ साहित्य संघातर्फे आम्ही प्रा. ना. सी. फडके यांचे अभिनंदन करून त्यांना दीर्घायुष्य चिंतितो.

अनुक्रमणिका

उरी झोंबणारी कळ

उरी झोंबणारी कळ
जीव घेण्या आसुसली
अजाणत्या वेदनांनी
रिती–झोप चाळविली !

लोपे प्रकाश–किरण
पडे काळोखाची छाया
बोच साहून शल्याची
डोही विव्हळली काया !

युगयुगाच्या अंधारी
नाही खंत...आभाळाला
बोचणाऱ्या वीजेस्तव
हिमालय उभारला !!

—आत्माराम भोयर

★ ★ ★

पा य वा ट –

काळ्या कुट्ट मध्यरात्री
लुकलुकत्या चांदण्यात
भासे विषारी वाकडी
गोरीपान सर्प–कात ! १

अनामिक पापणीत
विसावल्या चोहीवाटा
सुखमय घरेवरी
प्रेमासाठी झुरे आशा ! २

रातराणीच्या बागेत
नागमोडी दिव्यपाट
काळ्या डोहातूनि गेली
हृदयाची पायवाट ! ३

—बासूत चौधरी

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून

केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा–

रविवार दि. २०-११-१९६० रोजी रात्रौ ८-३० वा. केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली होऊन तीत पुढील-प्रमाणे मुख्य कार्यवाही करण्यात आली:–

१. मागील सभेचा अहवाल मंजूर करण्यात आला.

२. मराठी साहित्य महामंडळाच्या सभेवर पुढील तीन प्रतिनिधि नियुक्त करण्यात आले–१. संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, २. सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर ३. श्री. पु. य. देशपांडे.

३. सभासदत्वासाठी आलेल्या ६३ नवीन आवेदनपत्रांना मंजुरी देण्यात आली

४. भारतीय भाषाध्ययन मंदिर, महाल, नागपूर आणि मधुपुरी ज्ञानोपासक मंडळ, मोहपा या दोन संस्थांना संलग्नसंस्था करण्यात आले.

५ प्रा. भा. ल. भांबूरकर यांचा चिटणीसपदाचा राजिनामा स्वीकारण्यात आला.

६. वणी येथील आगामी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदाबाबत वणीवरून आलेल्या दि. १९-१०-६० च्या पत्राचा सांगोपांग विचार करून कार्यकारी मंडळाने सुचविलेल्या नावांत घटनेप्रमाणे कोणताहि बदल करता येत नाही असा एकमताने निर्णय घेण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति: "ज्ञानेश्वरी" व्याख्यानमाला–

दि. २५, २६, २७ व २८ ऑक्टोबर आणि १, २, ३ आणि ४ नोव्हेंबर ६० रोजी सायं. ७ वा. वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांची "ज्ञानेश्वरी" वर ८ व्याख्याने झाली.

'ज्ञानेश्वरी' वर प्रवचन

'श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथि' निमित्त दि. १७-११-१९६० रोजी रात्रौ ९ वा. वि. सा. संघाच्या कै. गडकरी सभागृहात माननीय श्री. बाळासाहेब भारदे, सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे 'ज्ञानेश्वरी' वर प्रवचन झाले.

अनुक्रमणिका

टॉलस्टॉय दिन–

वि. सा. संघ, इंडियन कमिटी फॉर कलचरल फ्रीडम नागपूर शाखा, आणि सुविचार प्रकाशन मंडळ यांच्या विद्यमाने जगद्‌विख्यात रशियन साहित्यिक व तत्वज्ञ महर्षि लिओ टॉलस्टॉय यांची अर्धशतसांवत्सरिक पुण्यतिथि रविवार दि. २०-११-६० रोजी सायं. ५ वा. वि. सा संघाच्या धनवटे रंगमंदिरात श्री. पु. य. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. सुरुवातीला प्रा. श्री. गो. काशीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर सुविचार प्रकाशन मंडळाचे व्यवस्थापक श्री. श्यामकान्त बनहट्टी यांनी परिचयात्मक भाषण केले. मुख्य वक्ते म्हणून श्री. मा. ज. कानेटकर यांनी भाषण केले. याप्रसंगी "What then must we do?" ह्या टॉलस्टॉय यांच्या प्रख्यात ग्रंथाचे श्री. मा. ज. कानेटकर यांनी केलेल्या भाषांतरग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन झाले. ह्यावेळी प्रकाशनाला अनुसरून माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी पाठविलेला ध्वनिमुद्रित संदेश ऐकविण्यात आला. ह्या ग्रंथाचे सर्व हक्क महाराष्ट्र शासनाचे-द्वारे मराठी जनतेला अर्पण केल्याचे श्री. मा. ज. कानेटकर यांनी घोषित केले. शेवटी आभार प्रदर्शन होऊन हा कार्यक्रम संपला.

नागपूर आकाशवाणीने हा कार्यक्रम दि. २१-११-६० ला ध्वनिक्षेपित केला; तसेच, महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाने मुख्यमंत्र्यांचा संदेश ध्वनिमुद्रित करण्याचे कार्य तत्परतेने केले, ह्याबद्दल उभयतांचा वि. सा. संघ आभारी आहे.

टागोरजन्मशताब्दि समिति–

महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या राज्यीय टागोरजन्मशताब्दि समितीवर विदर्भ साहित्य संघाचे प्रतिनिधि म्हणून श्री. ना. रा. शेंडे व प्रा. श्री. गो. काशीकर यांची नेमणुक करण्यात आली असून ह्या समितीची पहिली सभा मुंबई येथे शनिवार दि. २६-११-६० रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली झाली. तीत टागोरांच्या स्मृतीप्रित्यर्थ नाटचगृह बांधणें, टागोर वाङ्‌मयाचे मराठीत भाषांतर करणे व विद्यापीठात व्याख्यातृपदे निर्माण करणे इ. कार्यक्रमांचा विचार करण्यात आला.

भेटी व सत्कार

फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य श्री. स. वा. कोगेकर यांनी दि. ६-११-६० रोजी सायं. ६-३० वा. विदर्भ साहित्य संघाला भेट दिली.

विदर्भातील सुप्रसिद्ध कवि श्री. गु. ह. देशपांडे, तसेच वणी शाखेचे अध्यक्ष श्री. धुं. गो. देशमुख आणि कार्यवाह श्री. ल. श्री. खडक्कार यांनी दि. १२-११-६० ला सायं. ५-३० वाजता विदर्भ साहित्य संघाला भेट दिली.

अनुक्रमणिका

श्री. ह. रा. महाजनी, संपादक "लोकसत्ता" मुंबई यांनी दि. २१-११-६० रोजी सकाळी ८–३० वाजता वि. सा. संघाला भेट दिली.

शाखावृत्त

वर्धा शाखा

वर्धा शाखेची वार्षिक साधारण सभा दि. ९-१०-६० रोजी श्री. जे. एम. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होऊन पुढीलप्रमाणे कार्यकारी मंडळ निवडण्यात आले:–

अध्यक्ष–श्री. वामनराव घोरपडे; **उपाध्यक्ष**–श्री. बाबुराव चांदोरकर व सौ. उषाताई देशमुख.

कोषाध्यक्ष–श्री. बा. पु. मोहरीर; **चिटणीस**–श्री. श्री. पुं. कठाळे.

सहचिटणीस–श्री. पु. व. मशानकर व श्री. पुरुषोत्तम देशमुख.

कार्यकारी सदस्य–सर्वश्री प्रा. वनमाली, नानासाहेब करंदीकर, प्रा. कावळे, जे. एम्. देशमुख, जयंतराव मादुसकर, द. ज. वर्गी, वसंतराव शब्दे, मधुकरराव क्षीरसागर, कन्हाळकर, रा. तु. देशपांडे, उमाळे, देवेंद्रकुमार कुंवलवार, दा. गु. देशमुख, शांतीलाल शिंगारे व सौ. प्रतिभाबाई घारपुरे.

कवि श्री. ग. दि. माडगूळकर यांचे व्याख्यान–

"गोविंदाग्रजासारखा मी श्रेष्ठ कवि होईन अशी माझी महत्वाकांक्षा होती," असे उद्‌गार महाराष्ट्राचे लोकप्रिय कवि व गीतारामायणकार श्री. ग. दि. माडगूळकर यांनी वर्धा शाखेतर्फे दि. ३० सप्टेंबर ६० रोजी गांधी ज्ञानमंदिरात साहित्यप्रेमी श्रोतृवृंदांशी जे हितगुज झाले, त्यात काढले. संघाचे उपाध्यक्ष श्री. वामनराव घोरपडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी श्री. माडगूळकर यांनी आपल्या लिखाणाच्या द्वारे स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा परिचय करून दिला

गोंडवन शाखा (चंद्रपूर)–

दि. ९ नोव्हेंबर ६० रोजी शाखेच्यावतीने गांधी स्मारकनिधि तत्वज्ञान विभाग, महाराष्ट्र शाखेचे संयोजक श्री. आपटे गुरुजी यांचे "गांधी विचार दोहन" या विषयावर भाषण झाले.

तळोधी शाखा–

दि. २१-१०-६० रोजी कार्यकारी मंडळाची सभा श्री. जी. वी. मेश्राम यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी पदसिद्ध सभासद म्हणून प्रा. तु. वि. गेडाम उपस्थित होते.

अनुक्रमणिका

यावेळी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

१. शाखेचे कार्य वाढविण्याच्या दृष्टीने एक खुले नाट्यगृह बांधणे.

२. शाखेचे कामकाज चालविण्यासाठी म्हणून निरनिराळया समित्या स्थापन करणे.

३. 'साहित्य रत्न' नावाचे त्रैमासिक हस्तलिखित काढण्याचे ठरले. हे कार्य प्रामुख्याने श्री. पां. सि. ओविलवार, श्री. र. ना. गजभे आणि श्री. कृ. स. लाडसे यांचेकडे सोपविण्यात आले. नव्याने निघणाऱ्या त्रैमासिकाचा प्रकाशन समारंभ वणी येथील साहित्य संमेलनात करण्याचा प्रयत्न करण्यात यावा, असे ठरले.

वाङ्मय--वार्ता

विदर्भाच्या व विदर्भाबाहेरील १२५ नव्या-जुन्या कवींचा प्रातिनिधिक कवितासंग्रह श्री. बाबा मोहोड यांनी 'घागर' या नांवाने संपादित केला असून तो "**वंदन प्रकाशन, मंगलधाम माधान**" या प्रकाशन संस्थेतर्फे विदर्भ साहित्य संघाच्या येत्या अधिवेशनात प्रकाशित होईल. या संग्रहाला प्रा. भ. श्री. पंडित हे प्रस्तावना लिहिणार आहेत.

श्री. बाबा मोहोड यांच्या निवडक व प्रसिद्ध अशा १३ लघुकथांचा एक संग्रहहि "शेवंती" या नावाने वरील प्रकाशनातर्फेच विदर्भ साहित्य संघाच्या येत्या अधिवेशनांत प्रकाशित होईल.

बाबा मोहोड

रीता प्रकाशन, अमरावती, एका नवीन त्रैमासिकाचे प्रकाशन घोषित करीत आहे. प्रस्तुत त्रैमासिकाचा प्रथमांक २६ जानेवारी ६१ च्या सुमुहूर्तावर प्रकाशित होणार असून त्याचे संपादन श्री वामन प्रभु हे करणार आहेत. त्रैमासिकाचे नाव "रंग" निश्चित झाले असून वार्षिक वर्गणी केवळ तीन रुपये राहील.

* * *

अनुक्रमणिका

विनंती

विदर्भ साहित्य संघाला आजवर ज्यांनी रु. १००० किंवा अधिक देणगी दिली आहे त्यांच्या नावाचा फलक संघमंदिरात लावण्याची योजना सध्या विचाराधीन आहे. त्यानुसार देणगीदारांची नावे जुन्या कागदपत्रांतून शोधून काढून खाली दिली आहेत अनवधानामुळे ह्या यादीतून काही नावे गळली असण्याचा संभव आहे. तरी रु. १००० किंवा अधिक रक्कम दिलेल्या दात्यांपैकी कुणाचे नाव राहिले असल्यास देणगीच्या तपशीलासहित ते आमचे लक्षात आणून द्यावे अशी सर्व संबंधितांना विनंती आहे.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस–वि. सा. संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

रु. ५०००–किंवा अधिक देणगी देणारे देणगीदार

१	कै. श्री. दा. वि. देशमुख	उपकर्ते	रु. ७२५१
२	श्रीमंत दादासाहेब धनवटे	,,	,, ५००१
३	श्रीमंत लक्ष्मण श्रीधर ऊर्फ बाबूरावजी देशमुख		,, ६०००
४	श्रीमंत सौ. सत्यभामाबाई लक्ष्मण देशमुख		,, ५०००
५	श्रीमंत वसंतरावजी दत्ताजी ऊर्फ बाबूराव धनवटे		,, ६०००
६	सौ. शकुंतलाबाई वसंतराव धनवटे		,, ५०००
७	श्रीमंत मारोतीराव दत्ताजी धनवटे		,, ६०००
८	सौ. सुमतिबाई मारोतीराव धनवटे		,, ५०००
९	श्रीमंत शामराव दत्ताजी धनवटे		,, ६०००
१०	,, शंकरराव दत्ताजी धनवटे		,, ६०००
११	कृष्णराव दत्ताजी धनवटे		,, ६०००
१२	यशवंतराव दत्ताजी धनवटे		,, ६०००

अनुक्रमणिका

१३ श्रीमंत शिवाजीराव वसंतराव धनवटे	उपकर्ते	रु. ५०००
१४ कै. टिळक पर्स फंड, पुणे	देणगीदार	,, ५०००
१५ कै. डॉ. का. मो. पारधी		,, ५०००
१६ श्री. के. बालमुकुंद	,,	,, ५००१
१७ श्रीमंत पु. बा. काळे		,, ५१०१
१८ श्री. आनंदराव पु. काळे		,, ५०००
१९ श्रीमती मंगला काळे		,, ५०००

रु. १०००।–किंवा अधिक देणारे देणगीदार

१ दि. नागपूर इले. लाईट अँड पॉ–कंपनी	आश्रयदाते	रु १०००
२ सहकारी संस्था, नागपूर		,, १००१
३ श्री. शंकरराव जोग		,, १०००
४ श्रीमंत म. ग. चिटणवीस		,, १००१
५ श्री. त्र्यं. द. पारवेकर देशमुख		,, १०५०
६ श्रीमंत भास्करराव बुटी		,, ३००१
७ कै. श्रीमंत गोविंदराव वि. काणे	,,	१००१
८ श्रीमंत बापूसाहेब चिटणवीस	देणगीदार	१००१
९ श्री. अ. व्यं. कोठेकर		,, २५०१
१० कै. श्रीमंत पी. जी. बुटी		३००१
११ श्रीमंत केशवराव बुटी		,, २००१
१२ श्रीमंत गणपतराव बुटी		,, १००१
१३ गडकरी स्मारक समिति		,, २२२८

★ ★ ★

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके		रु. पैसे
★ १ निबंध परिमल		२–२५
२ सुमन संचय		१–२५
+ ३ मराठी गद्य		१–५०
+ ४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे		२–००
५ भारती (नाटक) नाना जोग		१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे		०–३५
७ कै. हरीभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २ रा		३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ)	ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
	(केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र	–ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक		३–००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	–डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी	–द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	–कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	–प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	–द. वि. तेंडूरकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका	–प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली	–प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०

१९ "युगवाणी" मासिक —वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)

★ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन यांचेकडे आहेत.

+ ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.

बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ. उत्तर. अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊ इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू झाले असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषाप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. ३ आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात. सभासदाचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(आ) **आश्रयदाते**—एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(इ) **सहाय्यक**—पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(ई) **हितचिंतक**—अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.
(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

हे मासिक श्री. **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे**, यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धरमपेठ, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका